RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक विदर्भाचा मानबिंदू

# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
२८ बुधवार जानेवारी २०२६
वर्ष ५ अंक २४२
पृष्ठ : ४ मूल्य रु : ३

### मतदानापूर्वीच महायुतीचा गुलाल!:

राज्यातील 15 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अंतिम दिवस होता. या प्रक्रियेनंतर आता निवडणुकीच्या रिंगणातील अंतिम लढतींचे चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले असून, राजकीय आखाड्यात खऱ्या अर्थाने प्रचाराचा धुरळा उडणार आहे. अर्ज माघारीच्या मुदतीनंतर आता प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या उमेदवारांची यादी निश्चित झाली असून, सर्वच पक्षांनी आपापल्या बालेकिल्ल्यात मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. दुसरीकडे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच महायुतीने कोकणात जोरदार मुसंडी मारत विजयाचे खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तब्बल 21 जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.




## ३ महिलांसह एका मुलाचा मृत्यू

**विदर्भ केसरी। मुंबई :**

राज्यात अपघातांचे सत्र सुरूच असल्याचे दिसत आहे. सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी सोलापुरातील पंढरपूरच्या मंगळवेढ्याजवळ भीषण अपघाताची घटना घडली. विठ्ठलाचे दर्शन घेऊन परतताना काळाने भाविकांवर घाला घातला. या अपघातात मृत पावलेले भाविक मुंबईचे असल्याची माहिती समोर येत आहे. चौघांच्या मृत्यूने मृतांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवदर्शन घेऊन परतणा-या भाविकांच्या कारला मंगळवेढ्याजवळ भीषण अपघात झाला. कारमधील तीन महिला आणि एका १४ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. अपघातातील सर्व भाविक मुंबईचे असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. रस्त्यावर अपघात झाल्याची माहिती मिळताच पोलिस अपघातस्थळी पोहोचले. या अपघातातील मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. पंढरपूर येथील विठ्ठलाचे दर्शन घेऊन भाविकांची कार मंगळवेढा मार्गे पुढील प्रवासासाठी जात होती. मंगळवेढाजवळ ढेकळेवाडी गावाजवळ समोरून येणा-या एका मालवाहतूक ट्रकने कट मारल्याने भाविकांची गाडी रस्त्याच्या बाजूला जाऊन उलटली. भीषण अपघातात तीन महिलांसह एका चौदा वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर अन्य पाच ते सहा भाविक गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या जखमींना मंगळवेढा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# ...तर मंत्रिपदही काढून टाका

## प्रकाश आंबेडकरांचा गिरीश महाजनांवर हल्लाबोल; वंचितची आक्रमक भूमिका

**विदर्भ केसरी।**



प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्या भाषणात संविधानांचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने चांगलेच वातावरण तापले आहे. वाद चिघळल्यानंतर गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरलो, असे स्पष्टीकरण दिले. आता यावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी गिरीश महाजन यांची थेट मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. अनावधानाने नाव घ्यायचे विसरलात, तर अनावधानाने मंत्रिपदही काढून टाकण्यात यावे, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

गिरीश महाजन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ज्या संविधानामुळे तुम्ही मंत्री झालात, ते संविधान कोणी लिहिले हेच जर तुम्हाला माहिती नसेल, त्यांचे नाव तुम्हाला घेता येत नसेल तर तुम्हाला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशी टीका करत आंबेडकरांनी पदाचा राजीनामा देण्याची मागणी केली आहे.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, आरएसएस नेहमीच दुतोंडी भूमिका घेते. एकीकडे आम्ही बाबासाहेबांना मानतो असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांच्या विरोधात कृती करायची. हिंदू कोड बिलाला सर्वात आधी विरोध कोणी केला असेल तर तो आरएसएसनेच केला होता. मनुस्मृतीने महिलांना हिंदू धर्मात कोणताही अधिकार दिला नव्हता, ना मालमत्तेचा, ना वैयक्तिक, ना स्वतःच्या शरीराचा. हे सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. त्यामुळेच आज एक महिला अधिकारी (माधवी जाधव) जाब विचारण्यासाठी पुढे आली, असे आंबेडकर म्हणाले.

**■ गिरीश महाजन यांनी आपण अनावधानाने नाव घ्यायचे विसरल्याचे म्हटले होते, यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, जर हीह चूक अनावधानाने झाली असेल, तर तुमचे मंत्रिपदही अनावधानाने काढून टाकण्यात यावे. ही काही छोटी-मोठी चूक नाही. तसेच ज्यांनी हे भाषण लिहून दिले त्यांच्यावर आणि ज्यांनी वाचले त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. महाजनांनी स्वतःच्या हाताने भाषण लिहिले असेल किंवा लिहून दिले असेल तरीही त्यांनी आंबेडकरांचे नाव वाचले नसेल, तर त्यांच्या कर्तव्यातील कसूर आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी आंबेडकरांनी केली आहे.**

# ३१ जानेवारीपर्यंत अंगणवाडी सेविकेकडे कागदपत्रे जमा करा

## ई-केवायसी दुरुस्तीला सुरुवात : गृहराज्यमंत्री पंकज भोयर



**विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीमध्ये चुकीची माहिती भरल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून हजारो लाडक्या बहिणींना १५०० रुपयांचा हप्ता मिळालेला नाही. अशा अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना आता पुन्हा 'ई-केवायसी'मध्ये दुरुस्ती करता येणार आहे.

ई-केवायसीतील चुकीच्या माहितीमुळे ज्या लाभार्थी महिलांना पैसे मिळत नाहीत त्यांच्याकडून पुन्हा अर्ज मागवण्यात आले आहेत. आज (दि. २७) पासून ३१ जानेवारीपर्यंत अंगणवाडी सेविकांकडे त्यांचा अर्ज आणि इतर कागदपत्रे जमा करावी लागणार आहेत.

ई-केवायसी करताना कॉलम चुकीचा भरल्यामुळे लाभ थांबल्याची माहिती समोर आली होती. आता ज्या महिलांचे पुन्हा अर्ज प्राप्त होतील त्याचे प्रशासनाकडून क्रॉस व्हेरिफिकेशन करून चुका दुरुस्त केल्या जाणार आहेत. चुका दुरुस्त झाल्यानंतर पुन्हा लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळणार आहे, असे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले. २७ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत ई-केवायसी करताना चूक झालेल्या लाडक्या बहिणींनी अंगणवाडी सेविकांशी संपर्क साधावा. लाडक्या बहिणींनी यासाठी एक अर्ज करावा लागणार आहे. त्यासोबत आधार कार्ड झेरॉक्स आणि स्वयंघोषणापत्र अंगणवाडी सेविकांकडे जमा करावे लागेल.

# अंधश्रद्धेच्या जाळ्यात ओढून तरुणाची हत्या!

## 'महाराजांकडून फुंकर मारलेली पुडी आवडत्या मुलीवर टाकलीस तर ती तुझी होईल

**विदर्भ केसरी। चंद्रपूर :**

चिमूर तालुक्यातील भिसी येथील तरुण बादल ज्ञानेश्वर मेश्राम (वय २२) याच्या बेपत्ता प्रकरणातून उघडकीस आलेला निर्घृण खून आणि त्यानंतर तपासादरम्यान मुख्य आरोपीने केलेली आत्महत्या, या घटनेने संपूर्ण चंद्रपूर जिल्हा हादरून गेला आहे. अंधश्रद्धेचा गैरफायदा, पैशाचे आमिष आणि विश्वासघात यांचे भयावह चित्र या प्रकरणातून समोर आले असून, गुन्हा उघडकीस आणण्यात चंद्रपूर पोलिसांना यश आले आहे.

. १७ जानेवारी २०२६ रोजी भिसी येथी गीता ज्ञानेश्वर मेश्राम यांनी पोलीस स्टेशन भिसी येथे तक्रार दिली होती की, त्यांचा मुलगा बादल मेश्राम हा उमरेड येथे सर्व्हिसिंगला टाकलेली दुचाकी घेऊन येतो असे सांगून घरातून निघून गेला; मात्र तो परत न आल्याने कुटुंबीय चिंतेत होते. या तक्रारीवरून दि. १९ जानेवारी २०२६ रोजी मिसिंग क्र. ०३/२०२६ नोंदविण्यात आली. मात्र त्याच दिवशी दुपारी 1 ते 3 वाजेदरम्यान मुख्य आरोपी देवानंद गोवर्धन श्रीरामे रा. मिनझरी व त्याचे दोन साथीदार – आरीफ उस्मानखॉं पठाण आणि सौरभ सुभाष चौधरी यांनी संगनमत करून खडसंगी–मुरपार जंगल परिसरात, देवानंदच्या शेतालगत असलेल्या नाल्याजवळ बादलचा गळा आवळून निर्घृण खून केला.

उर्वरित आरोपींच्या चौकशीदरम्यान आणि देवानंदने दाखविलेल्या ठिकाणी तहसीलदार, चिमूर यांच्या उपस्थितीत जंगलातील नाल्यात पुरलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला.

### अंधश्रद्धेच्या जाळ्यात ओढून नेले

**■ आरोपी देवानंद याने मृतकाला "आश्रमात महाराजांकडून फुंकर मारलेली पुडी मिळेल, ती आवडत्या मुलीवर टाकलीस तर ती तुझी होईल" असे आमिष दाखवून जंगलात बोलावले. अंधश्रद्धेचा फायदा घेत योग्य संधी साधून तिघांनी मिळून बादलची हत्या केली.**

### 19 जानेवारीला आईची मिसिंग तक्रार

**■ बादल घरी परत न आल्याने चिंतेत असलेल्या त्याच्या आई सौ. गीता ज्ञानेश्वर मेश्राम यांनी 19 जानेवारी 2026 रोजी पोलीस स्टेशन भिसी येथे मिसिंग रिपोर्ट दाखल केला. त्यावरून मिसिंग क्र. 03/2026 नोंदवण्यात आला आणि तपास सुरू झाला. तपासादरम्यान पोलिसांना आढळून आले की, मृतक बादल याला देवानंद श्रीरामे याने वारंवार 9 वेळा फोन कॉल केले होते. या संशयास्पद बाबीमुळे 20 जानेवारी रोजी देवानंदला भिसी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावण्यात आले.**

### 23 जानेवारीला मुख्य आरोपीची आत्महत्या

**■ पोलीस तपास पुढे सरकत असतानाच 23 जानेवारी 2026 रोजी मुख्य आरोपी देवानंद श्रीरामे याने ठाणेदारांच्या नावाने चिठ्ठी लिहून दारूमध्ये विष मिसळून आत्महत्या केली. या घटनेमुळे प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळाले. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमुळे तपासात महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले.**

## ट्रॅव्हल्सने पेट घेतला



**पुण्यातून यवतमाळकडे २७ प्रवासी घेऊन निघालेल्या 'चिंतामणी ट्रॅव्हल्स' या खासगी बसला मध्यरात्री अचानक भीषण आग लागली. सर्व प्रवासी गाढ झोपेत असल्याने मोठी जीवितहानी होण्याचा धोका उद्भवला होता. पण चालकाच्या प्रसंगावधानाने सारेच्या सारे सुखरुप बचावले. पण अख्खी बस जळून खाक झाली. हा थरारक घटनाक्रम सोमवारी मध्यरात्रीनंतर जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात घडला. (विदर्भ केसरी)**

# खासगी शाळांचे २,४०० कोटी थकले



**विदर्भ केसरी।नागपूर :**

खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारकडून भरपाई स्वरूपात दिले जाते. मात्र, गेल्या दशकभरात ही रक्कम वेळेवर न मिळाल्यामुळे राज्य सरकारवर आता सुमारे २,४०० कोटी रुपयांची थकबाकी जमा झाली आहे. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात आरटीई प्रतिपूर्तीसाठी केवळ १७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र ४५ ते ६९ कोटी रुपयेच वितरित झाले. ही रक्कम एकूण थकबाकीच्या तुलनेत अत्यंत नगण्य आहे.

सध्या सरकारने प्रतिविद्यार्थी वार्षिक प्रतिपूर्ती १७,६७० रुपये निश्चित केली आहे. महागाई, शिक्षकांचे वेतन, पायाभूत सुविधा आणि डिजिटल शिक्षण खर्च पाहता ही रक्कम खासगी शाळांसाठी अत्यंत अपुरी असल्याचे शाळा व्यवस्थापनांचे म्हणणे आहे. यामुळे अनेक शाळा संघटनांनी आक्रमक भूमिका घेत 'पैसे नाही, तर प्रवेश नाही' अशी घोषणा केली आहे. काही शाळांनी तर आरटीईअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडूनही थेट शुल्क मागण्यास सुरुवात केली असून, त्यामुळे कायद्याच्या 'मोफत शिक्षण' या मूलभूत तत्त्वालाच हरताळ फासला जात आहे.

### न्यायालयाचा आदेश, सरकारसमोर कसोटी

**■ मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला शाळांच्या थकबाकीची पडताळणी ८ आठवड्यांत पूर्ण करून पुढील २ आठवड्यांत रक्कम अदा करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, राज्याच्या आर्थिक स्थितीवरून हे आदेश कितपत प्रत्यक्षात येतात, याबाबत शिक्षण क्षेत्रात साशंकता व्यक्त केली जात आहे.**

# झेंडावंदन कार्यक्रमात मुख्याध्यापकाचा मृत्यू

**विदर्भ केसरी। बुलढाणा :**



बुलढाणा जिल्ह्यात हृदय पिळवणारी घटना घडली आहे. ७७ व्या प्रजासत्ताक दिनी सगळीकडे उत्साहाचं वातावरण असताना या आनंदात मिठाचा खडा पडला. मोताळा तालुक्यातील मोहेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झेंडावंदन कार्यक्रम सुरू होता. त्या दरम्यान शाळेतील मुख्याध्यापक दिलीप राठोड यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला . ही घटना झेंडावंदनाच्या कार्यक्रमादरम्यान घडल्यामुळे नागरिक, उपस्थित शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांमध्ये मोठी शोककळा पसरली आहे.

दिलीप राठोड हे शाळेचे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारीनं काम करत होते. प्रजासत्ताक दिनाच्या राष्ट्रध्वज फडकावण्याच्या क्षणीच त्यांना अस्वस्थ वाटू लागलं. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, हृदयविकाराचा झटका इतका तीव्र होता की तत्काळ उपचार मिळाले तरी वाचवणं शक्य झालं नाही. या घटनेनं संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शिक्षणवर्ग आणि ग्रामीण भागात शोकाची लाट पसरली आहे. अनेकांनी सोशल मीडियावर आणि स्थानिक पातळीवर शोक व्यक्त केला आहे. प्रजासत्ताक दिनासारख्या राष्ट्रीय उत्सवात अशी दुर्दैवी घटना घडणं हे अत्यंत दुःखद आहे. दिलीप राठोड यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाची आठवण कायम राहील. त्यांच्या कुटुंबीयांना, सहकारी शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना या अपरिहार्य नुकसानीचे सांत्वन करणे कठीण आहे. स्थानिक प्रशासनानं या घटनेची दखल घेऊन आवश्यक मदत आणि चौकशी करण्याची अपेक्षा सर्वच स्तरातून व्यक्त होत आहे.

या घटनेमुळे हृदयविकाराच्या वाढत्या समस्येकडंही लक्ष वेधलं जात आहे. ह्या घटना विशेषतः तणावपूर्ण कामकाज आणि वयस्क व्यक्तींमध्ये आढळून येत आहे . आरोग्य तज्ज्ञांनी नियमित तपासणी आणि जीवनशैलीत बदल करण्याचं आवाहन केलं आहे. अशाच दुसऱ्या एका घटनेत, धाराशिव जिल्ह्यात प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमादरम्यान एका उत्पादन शुल्क उपनिरीक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्यानं मृत्यू झाला, असं एका अधिकाऱ्यानं सांगितलं. अधिकारी म्हणाले की, मोहन जाधव (५६) हे उमरगा तालुक्यातील तळमोडे सीमा तपासणी नाक्यावर ध्वजारोहणानंतर कर्मचाऱ्यांच्या सामूहिक छायाचित्रासाठी उभे असताना अचानक त्यांची प्रकृती बिघडली आणि ते कोसळले.

## बहिणींचा संताप : ईकेवायसी न केल्याने सुमारे ५० लाख लाडक्या बहिणी बाद

# २६ लाख लाडक्या बहिणींचा डिसेंबर महिन्याचा हप्ता थकला

**विदर्भ केसरी। मुंबई (प्रतिनिधी)**



ईकेवायसी करूनही राज्यातल्या तब्बल २६ लाख लाडक्या बहिणींचा डिसेंबर महिन्याचा दीड हजार रुपयांचा हप्ता बँक खात्यात जमा झालेला नाही त्यामुळे लाडक्या बहिणींमध्ये महायुती सरकारच्या विरोधात रोष निर्माण झाला आहे. जळगावमध्ये या संतापाचा विस्फोट झाला आणि असंख्य लाडक्या बहिणी जळगावातील महिला व बाल विकास केंद्रात घुसल्या आणि त्यांनी जाब विचारला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र असूनही या योजनेचा लाभ उकळणा-या लाडक्या बहिणींमुळे राज्याच्या तिजोरीवरील आर्थिक भार वाढू लागला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींची संख्या कमी करण्यासाठी राज्य सरकारने सर्व लाडक्या बहिणींना ई केवायसी सक्तीचे केले. ३१ डिसेंबरपर्यंत ईकेवायसीची मुदत होती. या योजनेत सुमारे २ कोटी ४० लाख महिला लाभार्थी होत्या. त्यातील सुमारे १ कोटी ९० लाख महिलांनी ईकेवायसी केले. ईकेवायसी न केल्याने सुमारे ५० लाख लाडक्या बहिणी बाद झाल्या.

सरकारने दिलेल्या मुदतीत ईकेवायसी करूनही सुमारे २६ लाख महिलांना या योजनेचा दीड हजार रुपयांचा हप्ता मिळालेला नाही त्यामुळे महिला संतप्त झालेल्या आहेत. ईकेवायसीनंतरही जळगावमधील सुमारे १ लाख महिलांना पैसे मिळाले नाहीत. यामुळे संतप्त झालेल्या महिला थेट जळगावमधील महिला व बाल विकास कल्याण केंद्रात घुसल्या आणि अधिका-यांना जाब विचारला. मकर संक्रांतीच्या पूर्वी डिसेंबर महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना मिळेल, असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले होते; पण तरीही खात्यात पैसे जमा झाले नाहीत. सरकारने दिलेल्या मुदतीत आम्ही ईकेवायसी करूनही पैसे न मिळाल्याने संतप्त झालेल्या महिलांनी केंद्रात गोंधळ घातला त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### आता ईकेवायसी पुन्हा करणार

**■ ईकेवायसीला आता पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नाही; पण ज्या महिलांनी ईकेवायसी केले आहे तरीही पैसे मिळालेले नाही अशा महिलांचे ईकेवायसी करण्यात येणार आहे. त्यासाठी आंगणवाडी सेविकांची मदत घेतली जाणार आहे.**

# बँकांच्या ५ दिवसांच्या आठवड्यासाठी एक दिवस ठप्प!

**विदर्भ केसरी। वर्धा,**



पाच दिवसांची बँकिंग व्यवस्था लागू करण्याच्या मागणीसाठी बँक कर्मचाऱ्यांनी आज २७ रोजी संप पुकारला. त्यामुळे बँकिंग व्यवहार मोठ्या प्रमाणात ठप्प झाले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नऊ संघटनांचा समावेश असलेल्या युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने हा देशव्यापी संप पुकारला. २३ जानेवारी रोजी मुख्य कामगार आयुक्तांसोबत झालेल्या सलोखा बैठकीत कोणताही सकारात्मक निर्णय न निघाल्याने हा टोकाचा निर्णय घेण्यात आला होता. शनिवार, रविवार सुट्टी, सोमवारी प्रजासत्ताकदिन तर आज मंगळवारी संप असल्याने बँकींग व्यवहाराला चांगलाच फटका बसला.

जिल्ह्यातील सुमारे १ बँक कर्मचारी संपात सहभागी झाल्याने अंदाजे ५०० कोटी रुपयांचे व्यवहार ठप्प झाले. सलग बँका बंद असल्याने सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर खोळंबले. वर्ध्यातील आंदोलनाची सुरुवात एसबीआय मुख्य शाखेत घोषणाबाजीने झाली. त्यानंतर एसबीआय मेन ब्रँच ते बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिस दरम्यान रॅली काढण्यात आली. झोनल ऑफिस परिसरात पुन्हा तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी बँक ऑफ इंडिया अधिकारी संघटनेचे झोनल सेक्रेटरी वैभव लहाने म्हणाले की, ८ मार्च २०२४ रोजी १२ व्या द्विपक्षीय करारानुसार Five-day banking system ५ दिवसांच्या बँकिंग व्यवस्थेला मान्यता देण्यात आली होती. मात्र २२ महिने उलटूनही केंद्र सरकारकडून अधिसूचना जारी न करणे हे कराराचे उल्लंघन असल्याचा आरोप त्यांनी केला. बँकिंग क्षेत्रात वाढता कामाचा ताण, मनुष्यबळाची कमतरता आणि ढासळता काम-जीवन समतोल यामुळे कर्मचाऱ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून याचा थेट परिणाम ग्राहक सेवा आणि बँकांच्या कार्यक्षमतेवर होत असल्याचे संघटनांनी नमूद केले.

# शेतकऱ्यांचा आवाज, गरीबांचा आधार

## – गोपाल मधुकर भालेराव यांची संघर्षमय यशोगाथा-----



अमरावती जिल्ह्यातील चांदुरबाजार तालुक्यातील धानोरा पूर्णा या छोट्याशा गावातून उगम पावलेले गोपाल मधुकर भालेराव हे आज परिसरातील शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब, विद्यार्थी आणि सामान्य जनतेसाठी लढणारे निर्भीड नेतृत्व म्हणून ओळखले जातात. ग्रामीण भागातील सामान्य माणसाच्या वेदना, शेतकऱ्यांचे प्रश्न, गरीबांचे दुःख आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हीच त्यांच्या जीवनाची ओळख बनली आहे. सामान्य कुटुंबात जन्मलेला हा तरुण आज शेतकऱ्यांचा आवाज, गरीबांचा आधार आणि अन्यायाविरुद्ध उभा राहणारा संघर्षशील व्यक्ती म्हणून लोकांच्या मनात आपले स्थान निर्माण करत आहे. धानोरा पूर्णा या गावात शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील शेतकरी असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांनी शेतीतील कष्ट, ग्रामीण जीवनातील संघर्ष आणि गरीब शेतकऱ्यांची व्यथा जवळून पाहिली. वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी काहीतरी करावे, ही भावना त्यांच्या मनात बालपणापासूनच रुजत गेली. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, धानोरा पूर्णा येथे पहिली ते चौथीपर्यंत झाले. पुढे पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण राजना पूर्णा येथे पूर्ण केले. अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी चांदुरबाजार येथील जी. आर. काबरा महाविद्यालयात घेतले. शिक्षण घेत असतानाच समाजातील वास्तव परिस्थिती, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि गरीबांची व्यथा त्यांच्या मनात खोलवर रुजत गेली. आज त्यांना एक मुलगा व एक मुलगी असा सुंदर परिवार असून, कुटुंबीयांचा आधार आणि ग्रामीण संस्कार हेच त्यांच्या कार्याची प्रेरणा ठरली आहे. गरीब परिस्थितीतून आलेल्या गोपाल भालेराव यांनी केवळ स्वतःच्या आयुष्यापुरते मर्यादित न राहता समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला. वसुधाताई देशमुख या आमदार व कॅबिनेट मंत्री असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सामाजिक आणि राजकीय कार्याची दिशा निश्चित केली. सन 2008 मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. त्या काळात शेतकरी, शेतमजूर, गरीब व दुर्बल घटकांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. कर्जमाफी, हमीभाव, पाणी, वीज, रोजगार, शिक्षण यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी शासन व प्रशासनाशी निर्भीडपणे लढा दिला. कोरोना महामारीच्या काळात समाजातील गरजू घटकांसाठी मदत करणे हेच आपले कर्तव्य आहे, असा ठाम विचार त्यांनी केला. कोणत्याही पक्षाचा आधार न घेता शेतकरी, गरीब आणि गरजू लोकांना मदत मिळाली पाहिजे, त्यांच्या प्रश्नांची लढाई स्वतः लढली पाहिजे, या भावनेतून त्यांनी एक नवा सामाजिक प्रवास सुरू केला. सन 2020 मध्ये मित्र आणि शेतकरी परिवाराच्या सहकार्याने त्यांनी "लोकविकास संघटना" या सामाजिक संघटनेची स्थापना केली.

विदर्भ केसरी
श्री सुयोग अरविंदराव गोरले
पत्रकार व क्रीडा मार्गदर्शक

ही संघटना केवळ नावापुरती न राहता शेतकरी आणि गरीब जनतेसाठी संघर्ष करणारे प्रभावी व्यासपीठ ठरली. आजपर्यंत गोपाल मधुकर भालेराव यांनी शेतकरी, शेतमजूर, गरीब, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी शंभरपेक्षा अधिक आंदोलनांचे नेतृत्व केले आहे. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. शासन, प्रशासन आणि राजकीय व्यवस्थेविरुद्ध त्यांनी निर्भीड भूमिका घेतली. या संघर्षाच्या मार्गावर चालताना त्यांच्यावर तेरा वेळा गुन्हे दाखल झाले, तरीही त्यांनी आपला लढा थांबवला नाही. अन्यायाविरुद्ध लढणे हेच आपले कर्तव्य आहे, हा विचार त्यांच्या मनात कायम राहिला. गोपाल मधुकर भालेराव हे केवळ राजकीय कार्यकर्ते नाहीत, तर जनतेच्या सुख-दुःखात धावून जाणारे लोकनेते आहेत. एखाद्या गरीब कुटुंबावर संकट आले, शेतकऱ्यावर अन्याय झाला, विद्यार्थ्यांना मदतीची गरज भासली, तर सर्वप्रथम पोहोचणाऱ्या व्यक्तींमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमावर असते. ग्रामीण भागातील सामान्य माणसाला न्याय मिळावा, शेतकऱ्याला योग्य दर मिळावा, गरीबाला आधार मिळावा आणि विद्यार्थ्यांना संधी मिळावी, हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले आहे. गरीब परिस्थितीतून आलेले गोपाल मधुकर भालेराव हे आज शेतकऱ्यांसाठी लढणारे कर्तबगार आणि निर्भीड व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. संघर्ष, संवेदना आणि सेवाभाव यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. त्यांच्या कार्यातून ग्रामीण भागात एक नवी आशा निर्माण झाली आहे. आजही ते शेतकरी, गरीब, विद्यार्थी आणि सामान्य जनतेसाठी अविरत संघर्ष करत आहेत. त्यांच्या जीवनप्रवासातून एकच संदेश मिळतो — सामान्य माणसासाठी लढणारा माणूसच खरा नेता असतो.

## अग्रलेख

# निवडणूक

*महाराष्ट्रात जिथे राजकीय निवडणुकांची चाहूल नाही, तिथे विदर्भात मात्र एका वेगळ्याच 'निवडणुकीची' धडधड सुरू झाली आहे ती राजकारणाची नव्हे, तर साहित्याच्या सर्वोच्च व्यासपीठाची! जवळपास तीन दशकांनंतर विदर्भ साहित्य संघात खरी लोकशाही पाहायला मिळत असून, पंचवार्षिक निवडणुकीसाठी अध्यक्षपदाच्या रिंगणात तब्बल अकरा उमेदवार उतरल्याने साहित्य वर्तुळात प्रचंड उत्सुकता आणि चर्चांना उधाण आले आहे. महाराष्ट्रात १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद निवडणुका जाहीर झाल्या. मात्र त्यात विदर्भात एकही जिल्हा नाही. तरीही विदर्भात या आठवड्यात निवडणुकांचे वातावरण तापते आहे, मात्र ते फक्त साहित्य वर्तुळात. होय... विदर्भ साहित्य संघाच्या पंचवार्षिक निवडणुका आता जाहीर झाल्या आहेत. मधली जवळजवळ तीस वर्षे विदर्भ साहित्य संघात निवडणुका फक्त एकतर्फीच होत होत्या. कारण तिथे एकाच नेतृत्वाची अशी काही दहशत होते की दुसरा कोणीही मैदानात उतरण्याची हिंमत करत नसे. मात्र ही दहशत संपल्यामुळे यावेळी साहित्य संघात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित झाली आहे की काय असे वाटू लागले आहे. कारण पंचवार्षिक निवडणुका जाहीर होताच अध्यक्षपदासाठी एक-दोन नाही, तर चक्क ११ जण मैदानात उतरले आहेत. त्यामुळे निवडणुकांचे वातावरण आता चांगलेच तापलेले आहे. विदर्भ साहित्य संघ ही विदर्भातील सर्वात जुनी सक्रिय अशी संघटना राहिलेली आहे. या संघटनेला नुकतीच १०२ वर्षे झाली असून अनेक मान्यवर मराठी सारस्वतांनी या संघटनेचे नेतृत्व केलेले आहे. त्यात प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. सुरेश द्वादशीवार, ग. त्र्यं.माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, कवी अनिल अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे. आज या संस्थेचे जवळजवळ ९ हजार आजीवन सदस्य असून या संघटनेने एका काळात विदर्भाचे सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्र चांगलेच गाजवलेले आहे. नागपुरात भरवस्तीत एका काळात त्यांचे सुसज्ज असे नाट्यमंदिर धनवटे रंगमंदिर म्हणून प्रसिद्ध होते. तिथे अनेक गाजलेली नाटके होत असत. त्याशिवाय अनेक गाजलेले कार्यक्रम देखील झालेले आहेत. कित्येक संगीताच्या मैफलींनी इथे रात्रही जागवलेली आहे. मात्र मधल्या काळात या विदर्भ साहित्य संघाची भर वस्तीतील इमारत पुनर्विकासाच्या नावाखाली घराशयी केली गेली. त्याला तीन दशके लोटलेली आहे त्यानंतर तिथे अजूनही नवे रंगमंदिर उभे होऊ शकलेले नाही. मात्र तिथे निर्माण केलेल्या दहशतीमुळे ज्यांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला त्यांना साहित्य संघातून बाहेर केले गेलेले आहे. मात्र आता परिस्थिती बदललेली आहे. त्यामुळेच यावेळी अध्यक्षपदाच्या निवडणुकीला ११ उमेदवार रिंगणात उतरलेले आहेत, तर कार्यकारिणी सदस्यांसाठी १११ अर्ज आलेले आहेत. अध्यक्षपदासाठी आलेल्या अकरा अर्जांपैकी नऊ अर्ज हे साहित्यिक आणि नाट्यकर्मी मंडळींचे आहेत. एक अर्ज विद्यमान अध्यक्ष प्रदीप दाते यांचा आहे, तर एक अर्ज आपणच विदर्भाचे सांस्कृतिक नेते आहोत असे प्रस्थापित करू बघणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार डॉ. गिरीश गांधी यांचाही आहे. डॉ. गिरीश गांधींच्या उमेदवारीमुळे साहित्य वर्तुळात बऱ्याच चर्चा सुरू झालेल्या कानावर येत आहेत. डॉ. गिरीश गांधी हे मूळचे काँग्रेसचे नेते, आधी ते काँग्रेसमध्येच टी. जी. देशमुख यांसोबत होते. मग त्यांनी शंकरराव चव्हाण यांना जवळ केले होते. नंतर त्यांनी शरद पवारांशी जुळवून घेतले आणि त्यातून वर्षभराची आमदारकी देखील मिळवली होती. नंतर मात्र त्यांना पुढे काहीच मिळाले नाही. मात्र सर्वपक्षीय नेत्यांशी आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी जुळवून घेऊन सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात लुडबुड करणे हा त्यांचा आवडीचा उद्योग आहे. त्यातूनच ते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याही जवळ सरकलेले आहेत. गडकरींसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन ते हौसेने करत असतात. विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष हा साहित्यिक असावा असे अपेक्षित आहे. मात्र गिरीश गांधी यांचा साहित्याशी काही संबंध असल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. त्यांनी लिहिलेला एकही लेख किंवा कथा किंवा कविता कोणाच्याही वाचण्यात आल्याचे ऐकलेले नाही. तरीही त्यांनी साहित्य संघाच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला असून साहित्य संघाचे प्रशासन सुरळीतपणे चालावे यासाठी आपण अध्यक्षपदाच्या रिंगणात उतरलो असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्याचबरोबर आपण नितीन गडकरींचेच उमेदवार आहोत असेही ते भासवू बघत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे नितीन गडकरींना आता साहित्य संघावर ताबा मिळवायचा आहे अशीही चर्चा साहित्य वर्तुळात सुरू झाली आहे. वस्तूतः गडकरींना तसे करण्याची गरज वाटत नाही. अशाप्रकारे संस्था ताब्यात घेण्याचा गडकरींचा स्वभाव देखील नाही. काही साहित्यप्रेमी त्यांच्याशी बोलले असता तिथले तुम्ही बघा तिथे कोणीही अध्यक्ष आला तरी मला फरक पडत नाही असे त्यांनी सांगितल्याचे बोलले गेले आहे. तरीही जर गांधी आपणच गडकरींचे उमेदवार असे प्रोजेक्ट करणार असतील, तर त्यामुळे नितीन गडकरींबद्दलच गैरसमज वाढू शकतात. म्हणूनच या प्रकारात आता नितीन गडकरींनीच खुलासा करावा अशी अपेक्षा साहित्य वर्तुळात व्यक्त होत आहे. मात्र गिरीश गांधी यांनी साहित्य संघात निवडणूक कशाला घ्यायची अशी अपेक्षा व्यक्त करत सर्व इच्छुक उमेदवारांनी एकत्र बसावे आणि त्यातून सहमतीने कार्यकारिणी निवडावी अशी सूचना केली आहे. तिथेही त्यांनी नितीन गडकरी यांना मध्यस्थी करायला लावावी आणि त्यांच्या सहमतीने कार्यकारिणी बनवावी असेही सुचवले आहे. मात्र गडकरींना मध्ये का आणायचे असाही प्रश्न साहित्य वर्तुळात विचारला जातो आहे. गडकरींना जर मध्ये आणले तर गिरीश गांधी आपले संबंध वापरून स्वतःलाच अध्यक्ष करून घेतील असाही सूर निघतो. दुसरे असे की, गिरीश गांधी हे मराठी भाषिक नाहीत. त्यामुळे अमराठी व्यक्तीला साहित्य संघाचे नेतृत्व का द्यायचे असाही प्रश्न निर्माण होतो आहे. अर्थात अमराठी असलेल्या अनेक साहित्यिकांनी मराठीत चांगले साहित्य निर्माण केले आहे. त्यात डॉ. यु. म. पठाण, रतनलाल सोनग्रा, पन्नालाल सुराणा, जवाहर मुथा, गिरीश जाखोटिया अशी नावे सांगता येतील. तसे गिरीश गांधींचे साहित्यात काहीही योगदान नाही. त्यामुळेच त्यांच्या नावाला साहित्यिक वर्तुळात चांगलाच विरोध असल्याचे बोलले जात आहे. गिरीश गांधींव्यतिरिक्त साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे, झाडीबोलीचे साहित्यिक लखन सिंह कटरे, नाट्यकर्मी रंजन दारव्हेकर, प्रमोद भुसारी असे दिग्गज मैदानात उतरलेले आहेत. या सर्वांचे साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात निश्चितच मोलाचे योगदान आहे. शिवाय प्रशासनाचा देखील अनुभव आहे. त्यामुळे आता अध्यक्ष कोण होणार आणि कार्यकारिणीत कोण राहणार याकरिता साहित्य वर्तुळात आडाखे बांधणे सुरू आहे. अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख काल संपली. आता ९ फेब्रुवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे.*

# कोचिंग संचालकाची ३ लाखाने फसवणूक

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

शहरातील कोचिंग इन्स्टिट्यूट संचालकाला बिहार येथील चकसरगयी येथील अंशुल गुप्ता याने ३ लाखाने fraud फसवणूक केल्याचा प्रकार ८ फेब्रुवारी २०२१ रोजी पुढे आले.

याप्रकरणी न्यायालयाने चौकशी करून गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिल्यानंतर अंशुल गुप्ता याच्याविरुद्ध २५ जानेवारी रोजी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. फत्तेपुरीया ले-आऊट, गोंडप्लॉट येथील रहिवासी सुरेंद्र नगराळे यांचे शहरात कोचिंग इन्स्टिट्यूट आहे. त्यांना या कोचिंगसाठी डिजिटल बोर्ड, कॉम्प्युटर साहित्याची गरज होती. शूल टेक इलेट्रॉनिस प्रा. लिमीटेड ही कंपनी इलेट्रिक साहित्य उत्तम व कमी किमतीत विकत असल्याची माहिती मिळताच मित्र दीपक भुतडा यांच्यासमोर ते अंशुल गुप्ता यांच्याशी साहित्याबाबत बोलणी झाली.

लागणारे इलेट्रिक साहित्यासाठी ३ लाख रुपये लागतील असे अंशुल गुप्ता यांनी सांगितले. दीपक भुतडा हे अंशुल गुप्ता यांना ओळखत असल्याने एयु बँक शाखा आर्वी नाका येथील खात्यातून ती रकम अंशुल गुप्ता याच्या कोटक महिंद्रा बँक खात्यात ८ जानेवारी २०२१ रोजी टाकण्यात आली. पहिल्यांदा गुप्ता यांच्यासोबत व्यवहार करीत असल्याने सुरक्षा म्हणून ३ लाख रुपयांचा डिडी मागितला. गुप्ता यांनी ३ लाखांचा डिडी बनविला असल्याचे सांगून त्याचे फोटो नगराळे यांना पाठविले. त्यानंतर गुप्ता यांनी नगराळे यांना डिडी पाठविला. दरम्यान, ३० जानेवारी २०२१ रोजी गुप्ता यांनी फोन करून इलेट्रिक साहित्य देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे गुप्ता यांनी दिलेला डिडी वठविण्याकरिता युनियन बँक ऑफ इंडियामध्ये टाकला असता बँकेने त्यांचे मेमोद्वारे ८ फेब्रुवारी २०२१ रोजी नगराळे यांना डिडी बनावटी असल्याचे सांगितले.

# बहिरम येथे रक्तदानाचा कार्यक्रम संपन्न

## "तुम्ही करा रक्तदान, आम्ही देतो वृक्षदान" या संकल्पनेतून उपक्रम साजरा

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:**




-'संघर्ष ब्लड ग्रुप' व 'पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा' यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे निमित्ताने श्री क्षेत्र बहिरम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाला नागरिक व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

"तुम्ही करा रक्तदान, आम्ही देतो वृक्षदान" या संकल्पनेतून रक्तदान शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस प्रशासनातील वरिष्ठ कर्मचारी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ठाणेदार महेंद्र गवई व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचे मनोबल वाढवले. पोलीस प्रशासन केवळ हे कायद्याच्या रक्षणापूरते मर्यादित न राहता सामाजिक सेवेचा वसा सुद्धा जपण्यात अग्रेसर असल्याचे या उपक्रमातून दिसून आले.प्रत्येक रक्तदात्याला

प्रमाणपत्रासोबत एक रोपटे भेट देऊन पर्यावरणपूरक मित्रता राखण्याचा संदेश दिला. सोबतच सामाजिक संस्था क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले ब्लड डोनर ग्रुप अमरावती, महात्मा फुले ब्लड डोनर ग्रुप, रुग्णसेवक ब्लड डोनर ग्रुप, विर भगत सिंह फाउंडेशन,वर्धा तसेच वयक्तिक रुपम ज्ञानेश्वरराव केवटे, शिवदास रामराव भुयार,माधुरी सचिन चव्हाण, नितिन गोवर्धनराव देशमुख,अर्चना नितिन देशमुख यांनी रक्तदानाच्या चळवळीमध्ये केलेल्या योगदानाप्रती 'रक्तविर' म्हणून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व रक्तदाते व सहकार्य करणाऱ्या समाजसेवकांचे आभार मानण्यात आले.

# ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंचाला कोंडले

## कार्यालयात ठोकले कुलूप : ग्रामसभा तहकुबीने ग्रामस्थ संतप्त

**▸विदर्भ केसरी। वरूड,**



शेंदूरजनाघाट येथून जवळच असलेल्या सातणुर येथील गट ग्रामपंचायतीच्या वतीने सोमवार २६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. परंतु, अचानक ग्रामसभा तहकुब केल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आणि त्यांनी सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवकाला कार्यालयात कोंडले व कुलूप ठोकले. सातणुर, रवाळा, जामतळ, पुसली येथील नागरिकांना मुनादी फिरून ग्रामसभा असल्याचे कळवण्यात आले होते.

या सभेकरिता ग्रामसेवक विनोद घोगरे, सरपंच शिल्पा बर्डे, उपसरपंच सिमा गजभिये यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. परंतु, ग्रामसेवकाने या ग्रामसभेबाबत पोलिस पाटील, विस्तार अधिकारी, आरोग्य सेवक, तलाठी यांना नोटीस बजावून सुद्धा त्यांनी या सभेला दांडी मारल्याचे दिसून आले. ग्रामसभेला उपस्थित ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच यांनी ग्रामसभा सुरू होण्यापूर्वीच कोरम अपूर्ण असल्याचा दाखला देत सभा तहकुब करण्यात येत असल्याचे ग्रामवासियांना सांगितल्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ग्रामसेवक संरपंच, उपसरपंच यांना सातणुर ग्रामपंचायत कार्यालयात कोंडून कुलूप ठोकत निषेध व्यक्त केला. परंतु, काही वेळातच ग्रमामसेवक, सरपंच यांनी ग्रामवासियांसोबत आतून संवाद साधून ग्रामसभा घेण्याची संमती दिली. त्यानंतर ग्रामवासियांच्या उपस्थित ग्रामसभा पार पडली. ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

### सरपंच व ग्रामसेवकाकडून दिशाभूल : ग्रामस्थ

**■ ग्रामसभेकरिता सकाळी ११ वाजताची वेळ देऊन सुद्धा नागरिकांची उपस्थिती पुरेसी दिसत नसल्याने सरपंच शिल्पा बर्डे यांच्या सांगण्यावरून ग्रामसभा तहकुब करण्यात येत असल्याचे ग्रामसेवक घोगरे यांच्याकडून सांगण्यात आले. ११ वाजताची वेळ देऊन १२ वाजेपर्यंत नागरिकांची पुरेसी उपस्थिती दिसत नसल्याने ग्रामसेवकांनीच ग्रामसभा तहकूब करण्याचा निर्णय घेतल्याचे सरपंच बर्डे यांनी सांगितले. त्यामुळे सरपंच व ग्रामसेवक या दोघात संगमत असून दोघेही एकमेकांचा बचाव करण्यासाठी उपस्थित नागरिकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप उपस्थित ग्रामस्थांनी केला आहे.**

# एकतर्फी प्रेमातून दुहेरी हत्या

**▸विदर्भ केसरी। पुणे,**

पुणे जिल्ह्यात मजुरीसाठी एकत्र काम करणाऱ्या महिलेसोबतच्या एकतर्फी प्रेमातून एका सराईत गुन्हेगाराने दोन जणांची निर्घृण हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जैतू चिंधू बोरकर (वय ४३, रा. कोयंडे, ता. खेड) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर यापूर्वीही चार खुनांचे गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली.

सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काळखैरेवाडी (ता. बारामती) येथे १९ जानेवारी रोजी सकाळी एका महिलेचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला होता. तिच्या डोक्यावर गंभीर जखमा होत्या. या खुनाचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा आणि सुपा पोलिसांनी घटनास्थळावरील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. घटनास्थळी सापडलेल्या एका डायरीच्या आधारे संशय अधिक बळावला. तपासादरम्यान लालासाहेब मारुती जाधव यांच्याकडे चौकशी करण्यात आली असता, त्यांनी फुटेजमधील व्यक्ती जैतू बोरकर असल्याचे ओळखले. त्यानंतर पोलिसांनी खेड परिसरातून जैतू बोरकरला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने रंजना अरुण वाघमारे (वय ३५, रा. खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड) हिच्यावर एकतर्फी प्रेम असल्याची कबुली दिली. रंजना हिला जबरदस्तीने आपल्या सोबत राहण्याचा दबाव तो टाकत होता. तिने नकार दिल्याने आणि पोलिसांकडे तक्रार करेल या भीतीने आरोपीने तिचा खून केला. त्याआधी १७ जानेवारी रोजी रात्री कोयंडे गावातील चोर्याचा डोंगर परिसरात सूरज अंकुश वाघ (वय ३०, रा. वांगणी, ता. बदलापूर, जि. ठाणे) याच्या डोक्यात कोयत्याने वार करून त्याची हत्या केल्याचेही तपासात उघड झाले आहे.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला बुधवार दि. २८ जानेवारीपासून सुरुवात होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने अधिवेशनाला सुरुवात होईल. राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभेला संयुक्तपणे संबोधित करतील. या अभिभाषणातून केंद्र सरकारच्या आजवरच्या कार्यकाळाचा आढावा तसेच आगामी काळातील धोरणात्मक दिशा स्पष्ट केली जाण्याची शक्यता आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर दोन्ही सभागृहांमध्ये त्यावरील धन्यवाद प्रस्ताव मांडण्यात येईल. पुढील काही दिवस या प्रस्तावावर सत्ताधारी व विरोधी पक्षांकडून सविस्तर चर्चा होणार आहे. गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील. या आर्थिक सर्वेक्षणातून देशाची आर्थिक स्थिती, विकासदर, रोजगार, महागाई आणि विविध क्षेत्रातील कामगिरीचे चित्र समोर येणार आहे. त्यानंतर १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री देशाचा महत्त्वपूर्ण अर्थसंकल्प सादर करतील.

दरम्यान, अधिवेशनाचे कामकाज सुरळीत पार पडावे, यासाठी मंगळवारी केंद्र सरकारकडून सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. विरोधी पक्षांकडून काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सरकारसमोर विविध मुद्दे मांडले. राष्ट्रपतींच्या अभिभाषणात केंद्र सरकारने राबवलेल्या योजना, पायाभूत सुविधा, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा यांचा उल्लेख केला जाण्याची शक्यता आहे. तसेच पुढील काळात विकास, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्थैर्य यावर सरकारचा भर कसा असेल, याचे संकेतही दिले जाऊ शकतात.

**■ सीतारामन नवव्यांदा सादर करणार अर्थसंकल्प**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यानिमित्त सलग नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम त्यांच्या नावे होणार आहे.

**■ १३ फेब्रुवारीपर्यंत अधिवेशनाचा पहिला टप्पा**

२८ जानेवारीपासून सुरू होत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या काळात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊन तो मंजूर केला जाईल. तसेच केंद्रीय अर्थसंकल्पावरही सविस्तर चर्चा केली जाईल. त्यानंतर काही दिवसांची विश्रांती असेल. अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चपासून सुरू होऊन २ एप्रिलपर्यंत चालेल.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,

Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING
कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### वैशाली अलोणे (लांभाटे) यांचे निधन



दारव्हा: येथील मुळ निवासी तसेच हिंगोली जिल्हा परिषद ची सहायक शिक्षीका वैशाली शशांक अलोणे (वैशाली वसंतराव लांभाटे) (48) यांचे दिर्घ आजाराने 26 जनवरीच्या रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी हिंगोलीमध्ये अंतिम संस्कार करण्यात आले। त्यांच्या परिवारामध्ये पति, एक पुत्र, एक कन्या, तीन भाऊ, एक बहिण, आई असा परिवार आहे.

**महत्त्वाचे**

### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**▸विदर्भ केसरी। कळंब :-**



यवतमाळ तालुक्यातील पोलीस स्टेशन वडगाव (जंगल)येथे आज 26 जनवरी रोजी सकाळी 7:15वाजता प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वडगाव (जंगल)पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास दांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर शाळेतील चिमुकल्यांना पोलीस स्टेशन वडगाव (जंगल) तर्फे खाऊचे वाटप करण्यात आले यावेळी कार्यक्रमाला पोलीस स्टेशन येथील सर्व पोलीस बांधव शाळेचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



### आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

**▸विदर्भ केसरी। तालुका प्रतिनिधी**

पांढरकवडा :- टीचर्स एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित विकास हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास आर्णी–केळापूर मतदारसंघाचे आमदार प्रा. श्री. राजूभाऊ तोडसाम यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या शुभहस्ते विद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव श्री. आनंदभाऊ वैद्य तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ. अनुश्री वैद्य मॅडम यांची विशेष उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, देशाच्या प्रगतीत तरुण पिढीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच देशसेवेची भावना अंगीकारावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीपर गीतांनी व घोषणांनी संपूर्ण विद्यालय परिसर दुमदुमून गेला होता. प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामसभेत पोलीस पाटीलची अरेरावी

### तात्काळ निलंबनाची मागणी : शेतकरी चळवळ यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी ग्रामसभेत लोकशाही मूल्यांना तडा देणाऱ्या गंभीर घटनेप्रकरणी शेतकरी चळवळ,यवतमाळ यांच्या वतीने आज दिनांक २७ जानेवारी, (मंगळवार) रोजी जिल्हाधिकारी,यवतमाळ यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.सदर निवेदनाद्वारे संबंधित पोलीस पाटील यांच्यावर तात्काळ चौकशी करून निलंबन व कडक कारवाई करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे.

दिनांक २६ जानेवारी,(सोमवार) रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी मोहदा (ता.केळापूर / पांढरकवडा,जि. यवतमाळ) येथे ग्रामपंचायतीची अधिकृत ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती.या ग्रामसभेत गावातील युवक आकाश गजानन जिरे व इतर ग्रामस्थांनी विकास व प्रशासनासंदर्भात प्रश्न उपस्थित केले असता,पोलीस पाटील पियुष पंजाबराव गबरानी यांनी ग्रामसभेत थेट हस्तक्षेप करत युवकांना अरेरावीच्या भाषेत शिवीगाळ व धमकी दिल्याचा गंभीर प्रकार घडला.

सदर ग्रामसभा ही सरपंच अक्षय मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडत होती तसेच ग्रामसेवक समीर शेख हे देखील सभेला उपस्थित होते.ग्रामसभा ही ग्रामस्थांची सर्वोच्च लोकशाही संस्था असताना अशा प्रकारचा हस्तक्षेप म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा उघड अपमान व अधिकारांचा गैरवापर असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

या घटनेच्या निषेधार्थ आज शेतकरी चळवळ,यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी निलंबन न झाल्यास अन्नत्याग आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला. यावेळी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी,यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,आकाश जिरे,पवन राठोड,आकाश जाधव,अमन ढोरे,वैभव वैद्य,गणेश वादाफळे,ऋतिक मडावी,आकाश शेळके,शिवम राठोड,गोपाल चव्हाण,क्रिश जिरे व प्रा.पंढरी पाठे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित पोलीस पाटील यांना निलंबित करण्यात यावे,तसेच भविष्यात ग्रामसभेत लोकशाही अधिकारांमध्ये कोणताही हस्तक्षेप होऊ नये,अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली आहे.

## पंचशील मंडळातर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

२६ जानेवारी २०२६ रोजी जि. प. मराठी शाळा, नाकापार्डी (ता. जि. यवतमाळ) येथे पंचशील मंडळ, नाकापार्डी यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थी मित्रांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नोटबुक, वह्या, कंपास पेटी, ड्रॉइंग बुक, पेन व पेन्सिलचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. शिक्षणाच्या प्रवाहात कोणताही अडथळा येऊ नये, या उद्देशाने पंचशील मंडळाने हा उपक्रम राबविल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाला पंचशील मंडळाचे अध्यक्ष विनायक भवरे यांच्यासह गौतमप्रिय भवरे, अर्पित भवरे, अरुण भवरे, अमित भवरे, प्रफुल शेंडे, निलेश भवरे, स्वप्नील भवरे, द्यानेश्वर राऊत, रोशन बोरखडे, आदर्श भवरे, आकाश भवरे, कक्षप भवरे, कपिल बनसोड, रुपेश भवरे, अतुल राऊत, अमोल भवरे, अमोल गायकवाड, उमेश भवरे, ओमप्रकाश गायकवाड, निखिल भवरे, समाधान भवरे, प्रदीप मोहाडे आदी सदस्य उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने पंचशील मंडळाचे आभार मानण्यात आले.

## ग्राम सभेला ग्राम विकास अधिकारीच गैरहजर

### ग्राम विकास अधिकाऱ्याला गायब करण्याचा षडयंत्र तर नाही..?

**▸विदर्भ केसरी। दारव्हा**



दारव्हा प्रजासत्ताक दिना निमित्त प्रत्येक ग्राम पंचायत ला ग्राम सभा घेण्यासाठी अधिकारी असतो परंतु बोरी अरब ग्राम पंचायत सभेला ग्राम विकास अधिकारी गजानन गावंडे यांचीचा दांडी पाहायला मिळाली. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक बेसिक शाळा येथे ही ग्राम सभा सुरू होण्या आधीच ग्रामस्थानी प्रश्न उपस्थित करून ग्राम सभा गुंडाळण्यात आली. ग्राम विकास अधिकारी गायब तर नाही करण्यात आला. असा प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. शेवटच्या ग्राम सभेला अनेक सदस्य सुद्धा हजर नव्हते. जनतेनी प्रश्न मांडायचे तरी कोणा कडे हा देखील मोठी समस्या होती. रोड, नाली, पाणी, लाईट, या कडे पाठ फिरून ग्राम सभा गुलडाळली. या वेळी सरपंच व काही सदस्य हजर असताना ग्रामस्थानी सभेला विरोध दर्शवत ग्राम सभा स्थगिती केली...

2026 व 27 वर्षाचा कृती आराखडा निर्माण झाल्या च गौप्यस्फोट...

दारव्हा पंचायत समिती कडे ग्राम पंचायत सदस्या निरोप समारंभ होण्या आधी व प्रशासक लागण्यापूर्वी बोरी ग्राम पंचायत ने पंचायत समिती कडे चालू 2026 व 27 वर्षा चा कृती आराखडा तयार करण्यात आला अशी ग्राम पंचायत च्या कोअर कमिटी कडून माहिती प्राप्त झाली... जनतेच्या प्रश्नाचा निराकरण होत नसून शेवटच्या ग्राम सभा ही वादळी ठरणार होती परंतु राजकीय स्टंट करून ग्राम सभा रद्द करण्यात आली समस्त जनतेकडून राजकीय नेत्यांना डिवचल चाललंय पुढील ग्राम सभेची तारीख लवकरच जाहीर करू असे ग्राम विकास अधिकारी यांनी दूरध्वनी द्वारे कळवली...

## अंजुमन उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश!

### जिल्हास्तरीय 'इस्लामिक नॉलेज' स्पर्धेत पटकावले पहिले तीन क्रमांक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ:- स्थानिक प्रतिभांना वाव देण्यासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत अंजुमन उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. स्थानिक अब्दुल लतीफ ज्युनिअर कॉलेजच्या वतीने या 'इस्लामिक नॉलेज' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक नामांकित शिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत अंजुमन उर्दू हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट ज्ञानाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली आणि पहिल्या तीन स्थानांवर आपले नाव कोरले. विजेत्यां मध्ये प्रथम क्रमांक शेख अनवाझ अब्दुल नवाज शेख (उत्कृष्ट कामगिरीसह अव्वल स्थान) द्वितीय क्रमांक मध्ये मोहम्मद मुझैफ मोहम्मद मारूफ अली (उपविजेता) तृतीय क्रमांक अब्दुल्ला खान अतहर खान ने बाजी मारली. विद्यार्थ्यांच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल 'अंजुमन ग्रुप ऑफ स्कूल्स' प्रशासनाने सार्थ अभिमान व्यक्त केला असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

"विद्यार्थ्यांची कठोर मेहनत आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश संपादन करता आले," अशा शब्दांत मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाने विजेत्यांचे कौतुक केले. स्थानिक नागरिक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनीही या यशाची दखल घेत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळतो, असे मत व्यक्त होत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विजेत्यांना ट्रॉफी आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

## भीम आर्मी व आजाद समाज पार्टी कां. तर्फे प्रजासत्ताक दिन साजरा

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद, प्रजासत्ताक दिनानिमित्त आज पुसद येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. आंबेडकर हे केवळ संविधानाचे शिल्पकार नाहीत, तर समाजातील समानता, न्याय, आणि मुलभूत अधिकार यासाठी संघर्ष करणारे महत्त्वाचे नेते होते. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळावा यासाठी मार्ग दाखवला, ज्यामुळे भारतीय समाजात सामाजिक समता आणि प्रजासत्ताक मूल्यांचा विस्तार झाला. यावेळी उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करून संविधान व प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. हा कार्यक्रम भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कांशीराम) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव, आजाद समाज पार्टी युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत, युवा महासचिव विशाल भाऊ डाके उपस्थित होते. भीम आर्मी जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव यांनी मार्गदर्शन करत प्रजासत्ताकाचे महत्त्व सांगितले, संविधानाने दिलेल्या अधिकारांचे पालन करण्याची आणि समाजातील समानता व न्याय जपण्याची जबाबदारी नागरिकांवर असल्याचे स्पष्ट केले. तसेच राजकुमार भगत व विशाल भाऊ डाके यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत संविधान आणि प्रजासत्ताक दिनाचे सामाजिक व वैचारिक महत्त्व समजावून सांगितले. यावेळी प्रज्ञा पर्व माजी अध्यक्ष सुखदेव भगत सर, विठ्ठल कांबळे सर, रमेश सावळे, विशाल भाऊ घाटे, केवटे साहेब,वैभव खरतडे, स्वयम इंगळे, अनिकेत खरतडे, संतोष कांबळे, अनिकेत खंदारे, सुमित आढाव तसेच कार्यक्रमात दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी उत्साहाने सहभाग घेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साजरे केले. कार्यक्रम शांततामय व सुसंगत वातावरणात पार पडला.

### दोन कुत्र्यांचा वाहन चालकांवर हल्ला

**▸विदर्भ केसरी।**

**यवतमाळ:** बाभुळगाव मार्गावरील करळगाव घाटातही दोन कुत्रे दुचाकी वाहन चालकांवर हल्ला करीत आहेत. यामुळे या मार्गाने ये-जा करणारे यवतमाळ आणि बाभुळगाव येथील दुचाकी वाहन चालकांमध्ये या कुत्र्यांची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे. हल्ला करणा-या कुत्र्यांमध्ये एक जर्मन शेफर्ड आणि अन्य एका विदेशी कुत्र्याचा समावेश आहे. या कुत्र्यांनी 26 जानेवारीला सकाळी 9.30 वाजताच्या सुमारास यतमाळ येथून बाभुळगावकडे आपल्या दुचाकीने जात असलेल्या यवतमाळ येथील सचिन कावरे यांच्यावर हल्ला केला, यावेळी त्यांच्या सोबत पत्नी व लहान मुलगाही होता. घाटातील वन विभागाच्या नर्सरीपासून तर देवी मंदिरपर्यंत या कुत्र्यांनी या दाम्पत्याचा पाठलाग केला. शेवटी दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी स्लीप होवून हे दाम्पते किरकोळ जखमी झाले. यावेळी अन्य वाहनचालक मदतीला धावुन आल्याने हे दाम्पते कुत्र्यापासून बचावले.

## पत्रकारावरील जीवघेणा हल्ला आणि कोळसा घोटाळ्याचे धागेदोरे: घुग्घुसमध्ये खळबळ

**▸विदर्भ केसरी। चंद्रपूर-:**

एका बाजूला नागपुरात पत्रकारावर जीवघेणा हल्ला, तर दुसऱ्या बाजूला घुग्घुसमध्ये त्याच पत्रकाराविरुद्ध सूडबुद्धीने केलेली खोटी तक्रार, अशा गंभीर घटनेने पत्रकारितेच्या वर्तुळात आणि राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. दैनिक भास्करचे विशेष प्रतिनिधी शब्बीर अहमद सिद्दिकी यांच्यावर १८ जानेवारी २०२६ रोजी नागपुरात जो हल्ला झाला, तो केवळ वैयक्तिक वाद नसून एका मोठ्या कोळसा घोटाळ्याचा (Coal Scam) पर्दाफाश केल्याचा परिणाम असल्याचे बोलले जात आहे.




**■ नेमकी घटना काय?**

शब्बीर अहमद सिद्दिकी यांनी गेल्या काही दिवसांपासून महामाया इ फ्रा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि क्लीन कोड इंटरप्राईजेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांशी संबंधित कोळसा घोटाळ्याच्या बातम्या सातत्याने प्रकाशित केल्या होत्या. या बातम्यांमध्ये केसीपीएल (KCPL) वाशरीचे संचालक आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारावर थेट बोट ठेवण्यात आले होते. याच बातम्यांचा राग मनात धरून, १८ जानेवारीच्या रात्री नागपूर येथे सिद्दिकी यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे, या हल्ल्याचा कट आधीच रचला गेल्याचा संशय व्यक्त होत आहे

**■ सूडबुद्धीने 'खोटी फिर्याद'**

हल्ला झाल्यानंतर सिद्दिकी यांनी तातडीने पो लिसांत धाव घेऊन तक्रार दाखल के ली. मात्र, स्वतःला वाचवण्यासाठी आणि पत्रकाराचा आवाज दाबण्यासाठी सं बं धित आरोपींनी आणि कंपन्यांच्या सम र्थकांनी घुग्घुस पोलीस स्टेशनमध्ये सि द्दिकी यांच्याविरोधात एक बनावट (खो टी ) तक्रार दाखल केली. ही तक्रा र म्हणजे मूळ प्रकरणावरून लक्ष भरक टवण्यासाठी रचलेले एक मोठे षडयंत्र असल्याचे दिसून येत आहे

**■ घोटाळ्याची गांभीर्य**

1) लक्षणीय कंपन्या :महामाया इफ्रा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि क्लीन इंटरप्राईजेस प्रायव्हेट लिमिटेड
2) आरोप :- कोळसा वाटपात आणि वाशी संचालकांच्या संगत मताने झालेल्या कोटविधीचा घोटाळा
3) मुख्य सूत्रधार-: के सी पी एल बासरीचे संचालक आणि काही बडे अधिकारी

या प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले असून लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारावर अशा प्रकारे दबाव टाकणे आणि हल्ले करणे यावर सर्वत्र निषेध व्यक्त होत आहे गुगुस आणि नागपूर पोलीस या प्रकरणाचा तपास कसा करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## गणतंत्र दिनी डॉक्टरानी वृद्धाश्रमात वृद्धांशी केली चर्चा

### वडिलांचे स्वप्न साकार करणारा सेवायज्ञ : यवतमाळात 'स्व. श्री सत्यनारायण अमोलचंद भूत वृद्धाश्रम

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



समाजातील वृद्ध, निराधार आणि एकाकी व्यक्तींना सन्मानाने जगता यावे, या उदात्त हेतूने यवतमाळ–चौसाळा रोड परिसरात 'स्वर्गीय श्री सत्यनारायण अमोलचंद भूत वृद्धाश्रम' कार्यरत आहे. श्री मनीराम बाबा मानव सेवा संस्था यांच्या माध्यमातून चालवला जाणारा हा वृद्धाश्रम सेवाभाव, आत्मीयता आणि स्वबळावर उभा राहिलेला आदर्श उपक्रम ठरत आहे. निसर्गरम्य वातावरणात सुमारे पाच एकर क्षेत्रफळावर उभारलेल्या या वृद्धाश्रमात सध्या १२ वृद्ध व १३ महिला-पुरुष सुरक्षित व सन्मानजनक निवास करत आहेत. महिलांसाठी आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वैद्यकीय व निवास व्यवस्था, अद्ययावत भोजन कक्ष, भोजन तयार करण्यासाठी स्वतंत्र सुसज्ज स्वयंपाकगृह तसेच व्हीलचेअर सुविधेसह वैद्यकीय सेवा येथे उपलब्ध आहे. या वृद्धाश्रमाचे संचालक श्री हरिओमजी भूत व सौ. मंजू देवी भूत यांनी कोणतीही देणगी न स्वीकारता, पूर्णतः स्वबळावर हा सेवायज्ञ साकारला आहे. "वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच हा उपक्रम हाती घेतला," असे भावनिक मनोगत हरिओमजी भूत यांनी व्यक्त केले. भविष्यात या परिसरात अनाथ आश्रम उभारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला आहे. भूत कुटुंबातील दोन्ही सुपुत्र समाजसेवेत अप्रत्यक्ष हातभार लावत आहेत. निरंजन भूत एका नामांकित कंपनीत कार्यरत असून आशुतोष भूत यांनी स्वतःचा उद्योग सुरू केला आहे. कुटुंबातील सदस्य विविध क्षेत्रांत, अगदी अमेरिकेतही कार्यरत असले तरी समाजाशी नाळ जपण्याचा हा उपक्रम विशेष ठरतो. दरम्यान, गणतंत्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांची चमू यांनी वृद्धाश्रमाला सदिच्छा भेट दिली. वृद्धाश्रमाची माहिती जाणून घेतल्यानंतर डॉक्टरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी डॉ. मानसी तुपे यांच्यासह सहकाऱ्यांनी उपस्थित राहून वृद्धांना शुभेच्छा दिल्या. निःस्वार्थ सेवा, सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्यांचा संगम असलेला हा वृद्धाश्रम आज अनेकांसाठी आधारवड ठरत असून, समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण करत आहे.

गणतंत्र दिनानिमित्त अनेक मान्यवरांनी आज सदिच्छा भेट दिली त्यामध्ये भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ अमरावती विभागाचे अध्यक्ष विजयकुमार बुंदेला जिल्हाध्यक्ष डॉक्टर दीपक घरझोडे डॉ. मानसी तुपे डॉ. महिमा कोठारी, डॉ. अदिती जैन, डॉ. सईदा फातिमा अमरीनडॉ. मानसी तुपे डॉ. मोहित घाटे, डॉ. रमेश्वर थोरे डॉ. उज्वल इंडोरिया डॉ. आकांक्षा लाडोले डॉ. ओशन शिवरकर डॉ. पूर्वी तिमांडे डॉ. यामिनी तुमदाम डॉ. अरुण कल्याणकरआदी उपस्थित होते.

## सामाजिक कार्यक्रम व लग्न समारोहासठी नगर परिषद ची जागा उपलब्ध करा

### सामाजिक कार्यकर्ते बबलू कुरेशी यांची मागणी

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर | प्रतिनिधी**



दर्यापूर नगर परिषदेच्या हद्दीतील सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी नगर परिषद हॉल, शाळा व शाळेची खुली जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी येथील नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना सादर करण्यात आलेल्या विनंती अर्जात नागरिकांनी नमूद केले आहे की, विविध सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, सार्वजनिक सभा तसेच लग्न समारंभासाठी नगर परिषदेच्या मालकीच्या जागांची मोठ्या प्रमाणात गरज भासते. मात्र सध्या अशा कार्यक्रमांसाठी योग्य जागा उपलब्ध होत नसल्याने नागरिकांची अडचण होत आहे. नगर परिषद प्रशासनाने याबाबत काही अटी व नियम ठरविल्यास त्या अटी मान्य करण्याची तयारी नागरिकांनी दर्शविली असून, आवश्यक ते शुल्क भरण्यासही नागरिक तयार असल्याचे अर्जात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नगर परिषद हॉल, शाळा व शाळेची खुली जागा सामाजिक कार्यक्रम व लग्न समारंभासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे. या अर्जावर अनेक नागरिकांच्या सह्या असून, प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## बिबट्याचा थरार; ग्रामस्थांच्या धाडसामुळे बछड्यांना पकडले

निफाड तालुक्यातील मानोरी खुर्द परिसरात मादी बिबट्याचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कैलास शेळके यांच्या शेतात ही मादी बिबट्या तीन बछड्यांसह आढळून आली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ आणि वनविभाग घटनास्थळी दाखल झाले. मादी बिबट्या उसाच्या दाट शेतात पळून गेली, मात्र तिचे बछडे तिथेच अडकले होते. ग्रामस्थांच्या मदतीने दोन बछड्यांना पकडून जेरबंद करण्यात आले आहे. मात्र एक बछडा आणि मादी बिबट्या अद्याप फरार असून वनविभाग ड्रोनच्या सहाय्याने शोधमोहीम राबवत आहे. मादी बिबट्या बिथरलेली असल्याने नागरिकांना शेतात जाताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे

## *रस्त्याचा पृष्ठभाग न खोदता कॉँक्रिटिकरण

▸विदर्भ केसरी। विठ्ठल भागवत

**मालेगांव ता 26- वाकळवाडी ते मेडशी रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे होत आहे. अंदाजपत्रकानुसार काम होत नसल्याने त्या रस्त्याच्या मजबुतीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे**



■ सदर कामाची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत चौकशी करून शासनाचा करोडो रुपयांचा खर्च हा माती मोल होऊ नये करिता वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष द्यावे अशी मागणी मेडशी येथिल अतूल घुगे यांनी केली आहे

■ या रस्त्याचे कंत्राटदार मोठे कंत्राटदार आहेत ते नेहमी दर्जेदार काम करीत असतात. तरीही याबाबत पाहणी करून कार्यवाही करण्यात येइल असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता श्री जोगदंड म्हणाले

मेडशी पासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेले वाकळवाडी हे शंभर टक्के आदिवासी बहुल गाव आहे मेडशी वाकळवाडी खैरखेडा रस्त्याने येथील आदिवासी बांधवांना या ये जा करावी लागते रस्त्याची दुरावस्था झाली होती त्यामुळे रस्त्याचे मजबुतीकरण करण्याची मागणी गावकऱ्यांच्या वतीने वारंवार करण्यात येत होती.त्या अनुषंगाने येथे दीड किलोमीटरचा लांबीच्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम मंजूर करण्यात आले. त्याचा अंदाजित खर्च 1कोटी 10 लाख 55 हजार 810 रुपये आहे या रस्त्याचे काम सध्या सुरू आहे.अंदाजपत्रकामध्ये जुना डांबरीकरण झालेला खोदून काम करण्याचे म्हटलं आहे.या खोदकामासाठी अंदाजपत्रकात 1 लाख 57 हजार 500 रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात या रस्त्याचे मजबुतीकरण करीत असताना जुना रस्ता पूर्ण पणे खोदण्यात आला नाही. त्यामुळे या रस्त्याचे मजबुती वर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे या रस्त्याचे मजबुतीकरण करीत असताना सिमेंट कॉंक्रिट मध्ये सिमेंट चे प्रमाण कमी आहे. कॉंक्रिट ची जाडी अंदाजपत्रकातील जाडी पेक्षा कमी आहे त्यामुळे या रस्त्याच्या दर्जाकडे संबंधितांनी लक्ष द्यावयास पाहिजे

## महत्त्वाचे



## पिएम श्री.स्व.अहेमद उल्लाह खान न.प.उर्दु उच्च प्राथमिक शाळेत गणतंत्र दिन उत्साहात

▸विदर्भ केसरी। **पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

येथील स्व.अहेमद उल्लाह खान न.प.उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्र.३ रहेमत नगर पुसद येथे आज गणतंत्र दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरीन गाजी उस्सामा खान (नगर सेविका )होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून *नगर परिषद पुसदचे नवनिर्वाचित नगर सेवक जब्बार भाई (लाखे) गाजी उस्सामा खान ,फिरोज खान, अहेफज खान,नियमतउल्लाह चाचा, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साबिर अहमद व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य एजाज भाई,अब्बास खा, मोहम्मद अतीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरीन गाजी उस्सामा खान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशप्रेम, एकता व संविधानाच्या मूल्यांवर आधारित विविध सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन *मसरत शिरीन हिने अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन *सय्यदा शबाना हिने केले. या प्रसंगी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## अडम शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

▸**विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**

कुही तालुक्यातील अडम येथे आज दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी



जिल्हा परिषद शाळा, अडम येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन गट ग्रामपंचायत अडम यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवंत यादीत नाव मिळवलेल्या तसेच प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला शाळा शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. कृष्णा राखडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सौ. शालिनीताई शेलोकर (सरपंच, गट ग्रामपंचायत अडम), उपसरपंच नामदेव बुराडे, केंद्रप्रमुख अभिमन्यू वंजारी, गुणाकर शेलोकर, ग्रामपंचायत सदस्य मनोज भजनकर, राहुल भजनकर, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना तिजारे मॅडम, कस्तुरबा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक ठोकर सर, अडम गावातील आजी-माजी सरपंच, सदस्यगण व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुणाकर शेलोकर यांनी सुबक व प्रभावी पद्धतीने केले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा उद्देश या कार्यक्रमातून साध्य झाला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## तालुका पत्रकार संघाचे वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन!

▸**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापूर**

तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजीत रक्तदान शिबीरामध्ये उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला असून यावेळी डॉ.हेडगेवार रक्तपेढीचे सहकार्य लाभले. बाळापूर तालुका पत्रकार संघाच्या वतिने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिध्दार्थ शर्मा जिल्हाध्यक्ष शौकत अली मिरसाहेब सरचिटणीस प्रमोद लाजुरकर संघटक संजय खांडेकर उपाध्यक्ष रामदास वानखडे जेष्ठ पत्रकार रमेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली 21 व्या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी 55 रक्तदात्यांनी रक्त रक्त देण्याचे श्रेष्ठदान करुन या राष्ट्रीय कार्यास हातभार लावला. यावेळी रक्तदान शिबीरामध्ये रक्त संकलनाचे कार्य डॉ.हेडगेवार रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले.या शिबीरामध्ये ठाणेदार प्रकाश झोडगे यांचासह शहरातील विविध पक्षाचे पदाधिकारी व समाजसेवी संस्था संघटना व्यायामशाळा रक्तदाते यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीर पार पडले. रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी बाळापूर तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ता स्थापनेच्या घडामोडींना वेग

▸**विदर्भ केसरी। चंद्रपूर :**

चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ता स्थापनेच्या घडामोडींना वेग आला असून, कॉँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री येथे भेट घेतली आहे. सत्तास्थापनेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा होणार असल्याने, या भेटीकडे चंद्रपूरच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे. चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीनंतर सत्तास्थापनेचा तिढा कायम असतानाच, कॉँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज मुंबईत मातोश्रीवर हजेरी लावली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी सत्ता स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी ही भेट घेण्यात आल्याची अधिकृत माहिती देण्यात आली आहे.

## नगर पंचायत कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसवा

### नगरसेविका - सौ. प्रांजली राहुल गुल्हाने

▸**विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर ( तालुका प्रतिनिधी )**





सरकारी आणि खाजगी कार्यालयांमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि अचूक वेळेचे पालन (Accuracy) सुनिश्चित करण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी मशीन (Biometric Machine) लावणे आवश्यक आहे. ही मशीन 'बडी पंचिंग' (दुसऱ्याच्या नावाने हजेरी) टाळते आणि पगार प्रणालीशी (Payroll) थेट जोडता येते, ज्यामुळे मानवी चुका कमी होऊन कार्यक्षमता वाढते. हजेरी बायोमेट्रिक मशीन लावण्याची मागणी का? अचूकता आणि सुरक्षितता: फिंगरप्रिंट किंवा फेस रेकग्निशनद्वारे अचूक हजेरी, केवळ अधिकृत व्यक्तीच प्रवेश करू शकते. सर्व कर्मचार्यांना शिस्त: कर्मचारी कार्यालयीन वेळेत येत नसल्यास, बायोमेट्रिक हजेरीमुळे (उदा. जि.प. सेवक) वेळेवर येण्याची सक्ती होते. डिजिटल इंडिया: 'आधार-आधारित' (AEBAS) प्रणालीमुळे डिजिटल रेकॉर्ड ठेवणे सोपे होते.कालबाह्य पद्धत: पारंपारिक रजिस्टर पद्धत कालबाह्य असून, डिजिटल प्रणाली वेळेची बचत करते. नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसवण्यात यावी अशी मागणी करण्यत आली आहे, याबाबत सविस्तर असे की,स्थानिक नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत कार्यालयातील सध्याच्या हजेरी पद्धतीतील त्रुटींकडे वेधू इच्छितो. सध्याची मॅन्युअल (Manual) हजेरी नोंदवण्याची पद्धत वेळखाऊ असून, त्यात चुका होण्याची शक्यता असते. कार्यालयाच्या कामकाजात अधिक शिस्त, पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी, कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदवण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली (Biometric Attendance System) बसवण्यात यावी, यामुळे हजेरी प्रक्रियेचे स्वयंचलन (automation) होईल, मॅन्युअल नोंदीवरील वेळ आणि संसाधने वाचतील आणि कामाची जबाबदारी निश्चित होईल. या प्रणालीमुळे सर्व कर्मचाऱ्यांची कार्यालयीन वेळेत उपस्थिती सुनिश्चित होईल आणि प्रशासकीय व्यवस्थापनात सुलभता येईल.

नगर पंचायत कार्यालयात लवकरात लवकर बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसवण्याची व्यवस्था करावी. अशी मागणी लेखी निवेदनाव्दारे नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने प्रभाग क्रमांक १४ नांदगाव खंडेश्वर यांनी मुख्याधिकारी नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांना केली आहे

## जागतिक सूर्यनमस्कार दिवस मोठ्या उत्साहाने साजरा

▸**विदर्भ केसरी। मुर्तीजापुर**




येथील श्री संत गजानन महाराज बहुउद्देशीय संस्था कृष्ण कामिनी बहुउद्देशीय संस्था सिटी तायक्वांडो क्लब पतंजली योग समिती स्वच्छता अभियान नेहरू युवा मंडळ जी के अकॅडमी फौजी अकॅडमी मेजर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने मोठ्या उत्साहाने जय नारायण बुब विद्यालयाच्या प्रांगणात जागतिक सूर्यनमस्कार चे आयोजन करण्यात आले होते जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून मागील पंधरा वर्षापासून क्रीडा शिक्षक ज्ञानेश ताले व दिनेश श्रीवास यांच्या प्रयत्नाने मूर्तिजापूर येथे सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात येते या कार्यक्रमाला मूर्तिजापूरचे लाडके आमदार आदरणीय हरीश भाऊ पिंपळे तसेच नगराध्यक्ष हर्षल भाऊ साबळे गटनेता गजानन गावंडे जिल्हा क्रीडा कार्यालयाचे ऋषिकेश गावंडे उपस्थित होते मूर्तिजापूरचे पतंजली समितीचे योग गुरु विलास भाऊ नसले व जितेंद्र हासानी यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्कार आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमाला मूर्तिजापूर येथील विविध शाळेचे विद्यार्थी सेंट आन्स हायस्कूल फौजी अकॅडमी मेजर अकॅडमी भारती ज्ञानपीठ गाडगे महाराज विद्यालय सिटी तायक्वांडो क्लब चे विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला जे नारायण बुक विद्यालयाचे मुख्याध्यापक जाकीर सर गांजरे सर वाकोडे सर सुरज तिवारी सर माजी मुख्याध्यापक अविनाश बांबल विनोद देवके मोहम्मद अली मुन्ना श्रीवास विलास वानखडे गजानन वर्घट तेल मोरे सर घुगे सर विनोद काळपांडे मुकुंद पैकट गजानन चव्हाण हितेश जोशी सुनील भोजगडिया प्रेम राज शर्मा माजी मुख्याध्यापक सत्यनारायणाची तिवारी हे उपस्थित होते मोठ्या उत्साहाने कार्यक्रम यशस्वी पार पडला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश ताले यांनी केले व आभार प्रदर्शन दिनेश श्रीवास यांनी केले

## दोन अल्पवयीन शाळकरी मुलींचा विहिरीत अंत

▸**विदर्भ केसरी।**

एक अत्यंत धक्कादायक आणि मनाला चटका लावणारी घटना उघडकीस आली आहे. अवघ्या १४ वर्षांच्या दोन शाळकरी मैत्रिणींचे मृतदेह साकरी गावाजवळील विहिरीत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणी एका १७ वर्षीय मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, हे तिघेही 'आत्महत्या' करण्याच्या उद्देशाने एकत्र गेल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे.

भुसावळ तालुक्यातील तालुका पोलीस स्टेशनला माहिती मिळाली की भुसावळ तालुक्यातील साकरी गावातील दोन मुली बेपत्ता झाल्याची माहिती मिळालीमयत मुली या अवघ्या १४ वर्षांच्या असून त्या आपापल्या घरातून ट्युशनसाठी बाहेर पडल्या होत्या. मात्र, त्या घरी न परतल्याने पालकांचा जीव टांगणीला लागला होता. शोधाशोध सुरू असतानाच आज सकाळी

साकरी शिवारात आज (दि. २८) दोन अल्पवयीन मुलींचे मृतदेह विहिरीत आढळून आले. काळजाचा ठोका चुकवणारी बातमी समोर आली.

■ **प्रेमप्रकरण आणि 'बदनामी'ची भीती**

पोलिसांच्या प्राथमिक तपासात आणि ग्रामस्थांच्या चर्चेतून समोर आलेल्या माहितीनुसार, संबंधित १७ वर्षीय मुलाचे यातील एका मुलीशी प्रेमप्रकरण होते. या प्रकरणाची गावात वाच्यता झाल्यास बदनामी होईल, या भीतीपोटी तिघांनी (दोन मुली आणि तो मुलगा) आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते.

## जि प शाळा मजरा येथे प्रजासत्ताक दिन अतिशय आनंदात व उत्साहात साजरा

▸**विदर्भ केसरी। कळंब (ता. प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**

कळंब :-जि. प. शाळा मजरा येथे प्रजासत्ताक दिन अतिशय आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला. गावातून प्रभात फेरी काढण्यात आली . प्रभात फेरी दरम्यान बँडच्या तालावर लेझीम पथकाने लेझीम कवायत सादर केली. तसेच चौकातील कोलाम व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सामूहिक प्रार्थना घेण्यात आली. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये मुलांचे संगीतमय कवायत, देशभक्तीपर गीताचे सामूहिक गायन, मनोरे ,लेझीम व चिमुकल्यांचे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.




अंगणवाडीची विद्यार्थिनी प्रसिद्धी मोहन शिंदे हिचा वाढदिवस सर्व गावकऱ्यांसमोर साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समिती मजरा व गावातील इतर नागरिकांनी शाळेला थोर महापुरुषांचे दहा फोटो ,माइक स्टॅन्ड व टेबल अशा वस्तू देणगी स्वरूपात दिल्या. प्रजासत्ताक दिनानिमित्त गावातील नागरिक विजुभाऊ वैद्य यांनी सर्व विद्यार्थ्यांना बुक ,वही ,पेन ,पेन्सिल, खोडरबर ,शार्पनर इत्यादी वस्तू भेट म्हणून दिल्या. गावातील नागरिक श्री राजेशभाऊ खेडकर यांच्याकडून संपूर्ण गावकऱ्यांना चहा व चिवडा देण्यात आला. कार्यक्रमासाठी लागणारा संपूर्ण स्टेज व डेकोरेशनचा खर्च शाळा व्यवस्थापन समिती जि प शाळा मजरा यांनी केला.

पालकांनी विद्यार्थ्यांना भरभरून खाऊ वाटप केला. कार्यक्रमाचा आनंद लुटण्यासाठी गावातील सर्व गावकरी त्यांची सर्व कामे टाकून आवर्जून हजर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती मजरा, ग्रामपंचायत सदस्य, गावातील सर्व पालक, गावातील सर्व युवक युवती. शाळेतील स्वयंपाकी व मदतनीस अंगणवाडी सेविका ,अंगणवाडी मदतनीस ,आशा वर्कर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका वर्षा लोणारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षिका शितल येलेकार यांनी केले.

## मूर्तिजापूरात प्रजासत्ताक दिन उत्साहात,वीर भगतसिंग, सुखदेव व राजगुरूंच्या बलिदानानेच आजचे स्वातंत्र्य – आ. हरीश पिंपळे

▸**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

### मूकनायक पुरस्कारप्राप्त प्रा. एल. डी. सरोदे यांचा विशेष सत्कार; 'वीर भगतसिंग मंडळ' चे आयोजन.




"देशाच्या स्वातंत्र्यासाठी वीर भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी हसतमुखाने फाशीचा स्वीकार केला. त्यांच्या याच महान बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहोत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाच्या मनात प्रखर देशाभिमान आणि राष्ट्रप्रेम जागृत असणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन आमदार हरीश पिंपळे यांनी केले. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त 'वीर भगतसिंग मंडळ द्वारा आयोजित वीर जवानांना दीप प्रज्वलन व हार अर्पण व नवनिर्वाचित नगरसेवक व पदाधिकारी यांच्या सत्कार प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय भोलाशंकर गुप्ता होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर ठाणेदार अजित जाधव उपस्थित होते. स्वच्छ व सुंदर शहरासाठी सहकार्य करा: नगराध्यक्ष हर्षल साबळे या प्रसंगी उपस्थित असलेले नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी शहर विकासावर भर दिला. ते म्हणाले की, शहराचा विकास करणे आणि मूर्तिजापूरला सुंदर व स्वच्छ बनवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून, यात प्रत्येक नागरिकाचे सहकार्य मोलाचे आहे. प्रा. एल. डी. सरोदे यांचा गौरव कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे पत्रकारिता क्षेत्रातील मानाचा राज्यस्तरीय 'मूकनायक पुरस्कार' मिळाल्याबद्दल ज्येष्ठ प्रा. एल. डी. सरोदे यांचा आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी मूर्तिजापूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवक यांचा भव्य सत्कार करण्यात आला, या सोहळ्याला नगराध्यक्ष हर्षल रामेश्वर साबळे,उपनगराध्यक्ष रोहित अव्वलवार, नगरसेवक सचिन देशमुख शालीनी रामाभाऊ हजारे, , राहूल गुल्हाने, मुकेश काळबांडे, कैलास महाजन, निलेश शर्मा,राम पाटील खंडारे, रवींद्र माडकर,गजानन पाटील नाकट, राम जोशी, निलेश वानखडे, तसव्वर खान,यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जयस्वाल यांनी केले, प्रास्ताविक संजय भोलाशंकर गुप्ता यांनी केले तर आभार निरंजन गवई यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय गुप्ता, निरंजन गवई, धीरज (बाळा) धबाले, सौरभ हुतके पाटील, राहुल तिडके, गुड्डू तांबडे, प्रेम बैतूले, लकी थाटे, ऋषि जावरकर, पिंटू इंगळे, विजय अंभोरे, प्रविण चहाकर, नितीन शिंदे, आशिष नीलखन, अक्षय जोगळे, श्याम हेंगड, सचिन सरोदे, दीपक दांदळे, दीपक नितनवरे, छोटु देशमुख, संजय झारोडीया, प्रकाश कोलखेडे, उदय शिंदे, राजू दूरतकर, भयू ढोकने, निखिल गुप्ता व उज्वल ठाकरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला बायपास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून राष्ट्रभक्तीचा जयघोष केला.

## १९१ बटालियन सीआरपीएफच्या वतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

देसाईगंज : १९१ बटालियन केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), देसाईगंज येथे २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व गौरवपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास श्री. चौधरी महेश कुमार, द्वितीय कमान अधिकारी, १९१ बटालियन, श्री. अमर सिंह गुर्जर, उप-कमांडंट, श्री. साकेत विक्रम सिंह, सहाय्यक कमांडंट तसेच वाहिनीतील राजपत्रित अधिकारी, अधिनस्त अधिकारी व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने द्वितीय कमान अधिकारी श्री. चौधरी महेश कुमार यांनी उपस्थित अधिकारी व जवानांना मार्गदर्शन करताना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, देशाच्या वीर सुपुत्रांनी स्वातंत्र्यलढा लढून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्यानंतर भारताला प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून स्थापित करण्यासाठी २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अंमलात आले, आणि तो दिवस आपण दरवर्षी प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सीआरपीएफच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या शौर्य पदक, विशिष्ट सेवा पदक व सराहनीय सेवा पदक प्राप्त कर्मचाऱ्यांची नावे वाचून दाखविण्यात आली. या प्रसंगी उपस्थित सर्व जवानांना मिठाईचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी द्वितीय कमान अधिकारी श्री. चौधरी महेश कुमार यांनी उपस्थित जवानांना व त्यांच्या कुटुंबीयांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त



### डिप्राटोला (गांधीनगर) येथील महिलांनी केले अवैध दारूविरोधात प्रदर्शन ; जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना दिले निवेदन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील डिप्राटोला (गांधीनगर), ग्रामपंचायत नान्ही येथील महिलांनी आज मोठ्या संख्येने एकत्र येऊन अवैध दारू विक्रीविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त केला. या महिलांनी कुरखेडा तहसील कार्यालयात जमावाने धाव घेत तहसीलदार यांच्या मार्फत माननीय जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात महिलांनी स्पष्ट केले की, गावात मुरारी पंधरे, राधिका निताराम दिघोर, जागेश्वरी भावरसिंग कुमरे, शेवंता कुमरे, इकबालखान पठाण यांसारख्या व्यक्ती मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री करत आहेत. यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या खाईत लोटली जात असून, घरगुती हिंसा, आर्थिक संकट आणि सामाजिक विघटन वाढत आहे. दिनांक २२ जानेवारी रोजी महिलांनी स्वतः दारू पुरवठा करणारे चारचाकी वाहन (MH ४९ F ११४५) पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते, परंतु वाहनावर कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही. तसेच कुरखेडा येथील महामाया हॉटेल मालक विष्णू तकतानी हे गोंदिया जिल्ह्यातील केशोरी येथील परवानाधारक दुकानातून अवैध पुरवठा करत असल्याचा आरोप केला आहे. महिलांनी मागणी केली आहे की, येत्या १५ दिवसांत पकडलेल्या वाहनावर, मुख्य पुरवठादारांवर आणि गावातील सर्व अवैध विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी. अन्यथा मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. "आमच्या गावात दारू नको, आम्ही लढत राहू" अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या. गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी असूनही अवैध दारू विक्रीचे प्रकार वाढत असल्याने ग्रामीण भागात महिलांच्या या संघटनात्मक लढ्याला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. प्रशासनाकडून लवकरात लवकर प्रभावी कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### नागोबा देवस्थान यात्रेनिमित्त गोगांव येथे सास्कृतिक रंगत; लावणीने प्रेक्षकांना केले मंत्रमुग्ध

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : तालुक्यातील मौजा गोगाव येथील प्राचीन आणि भाविकांचे श्रद्धास्थान नागोबा देवस्थान यात्रेच्या निमित्ताने आयोजित "लई झक्कास लावणी" या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन नगर परिषद गडचिरोलीचे पाणीपुरवठा सभापती मा. लिलाधर भरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजकांकडून सभापती भरडकर यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी उपस्थित नागरिक आणि मान्यवरांना संबोधित करतांना मा. लिलाधर भरडकर यांनी सांगितले की, "अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे केवळ पारंपरिक लोककलेला चालना मिळत नाही, तर समाजात ऐक्य आणि सहकार्याची भावना देखील दृढ होते. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळणे आणि त्यांच्या कलेचे संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे. नागोबा देवस्थान यात्रेच्या या कार्यक्रमामुळे धर्म, संस्कृती आणि समाज या तिन्ही अंगांनी परिपूर्ण अनुभव मिळतो. सदर कार्यक्रमात अभिजीत अडरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. "लई झक्कास लावणी" या सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले आणि कार्यक्रमाच्या प्रत्येक क्षणी उत्सवाचे वातावरण जाणवले. सभा संपन्न झाल्यावर मा. लिलाधर भरडकर यांनी आयोजकांचे कौतुक करत सांगितले की, "अशी कला, संस्कृती व परंपरा जपणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक युवकांनी या प्रकारच्या उपक्रमांत सक्रीय सहभाग घ्यावा." या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे नागोबा देवस्थान यात्रेला आणखी सजग व उत्साहपूर्ण स्वरूप मिळाले असून नागरिकांनी आणि भाविकांनी यशस्वी आयोजनाचे कौतुक केले.



### प्रजासत्ताक दिनी वनविभागाच्या कर्तव्यदक्षांचा गौरव

एटापल्ली : दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, एटापल्ली यांच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणासह वनसंरक्षण, वनसंवर्धन व कृषी कामांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भामरागड वनविभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शैलेश मिना (भा.व.से.), उपवनसंरक्षक,भामरागड वनविभाग उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून अमर राऊत (भा.प्र.से.), उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एटापल्ली, आकर्श बी. बी. (भा.व.से.), परिविक्षाधीन वनसंरक्षक, चैतन्य कदम,उपविभागीय पोलीस अधिकारी, एटापल्ली, दीपक रामटेके, सहाय्यक वनसंरक्षक, रेखाताई मोहुर्ले नगराध्यक्षा, न. प. एटापल्ली, तसेच भामरागड वनविभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी मंचावर उपस्थित होते. यावेळी एटापल्ली शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वनसंरक्षण, वनसंवर्धन तसेच विविध कार्ययोजनांमध्ये कार्यरत असलेल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनरक्षक सुजाता अडगोपूलवार यांनी केले. प्रास्ताविक महेंद्र भांगर, वनपरिक्षेत्र अधिकारी (परिविक्षाधीन) यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय रामगुंडवार, वनपाल यांनी केले. या यशस्वी कार्यक्रमासाठी निलिमा खोब्रागडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, एटापल्ली व महेंद्र भांगर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच एटापल्ली वनपरिक्षेत्रातील सर्व क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला.

# सुविधा फार्मिंग व क्रिएटिव्ह इंडिया कंपनीकडून कोट्यवधींची फसवणूक

## स्थानिक एजंटवर तात्काळ गुन्हे दाखल करा : भाकपाची ठाम मागणी

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

एटापल्ली : ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, मजूर व आदिवासी जनतेला जादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची आर्थिक लूट करणाऱ्या 'सुविधा फार्मिंग अँड अलाईड लिमिटेड' आणि 'क्रिएटिव्ह इंडिया मल्टी स्टेट ॲग्रो पर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' या कंपन्यांविरोधात तीव्र जनरोष उसळला आहे. या प्रकरणी संबंधित स्थानिक एजंटवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी ठाम मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (भाकपा) केली आहे. भाकपाचे तालुका अध्यक्ष कॉ. रमेश कवडो यांच्या नेतृत्वाखाली आज एटापल्ली तहसील कार्यालयात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनबसादर करण्यात आले. यावेळी पीडित नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात सादर केल्या. त्यामध्ये सत्यनारायण पुज्जलवार, प्रतिमा जोरदार, कुमारेश जोरदार, संजय पुज्जलवार, आरती पुज्जलवार, जोसेफ बारावा, राजेश कुजूर, सुरेश कुजूर, जुलेश कुजूर व जगमा कुजूर यांचा समावेश आहे.

### एजंटांच्या माध्यमातून जनतेची फसवणूक

■ निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित कंपन्यांनी आपले एजंट नेमून “कंपनी शासनमान्य आहे, सुरक्षित गुंतवणूक आहे” असे भासवत ग्रामीण जनतेचा विश्वास संपादन केला. या एजंटांनी शेतकरी व आदिवासी नागरिकांना गुंतवणुकीस भाग पाडले. मात्र कंपन्या अचानक बंद पडल्याने गुंतवणूकदारांचे मुद्दल व वायदा केलेला परतावा दोन्ही बुडाले आहेत.
आज हेच एजंट जबाबदारी झटकत असून, पीडित नागरिकांना वाऱ्यावर सोडले जात आहे. त्यामुळे कंपनीचे संचालक, व्यवस्थापक तसेच संबंधित एजंट यांच्यावर फसवणूक व आर्थिक गुन्ह्यांतर्गत फौजदारी कारवाई*करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



### आदिवासी, शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट

■ या फसवणुकीमुळे अनेक गरीब कुटुंबांचे कष्टाने कमावलेले पैसे बुडाले असून, शेतकरी, मजूर व आदिवासी कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. ही केवळ खाजगी फसवणूक नसून, सरकारी नियंत्रण यंत्रणेच्या अपयशामुळे घडलेली आर्थिक लूट असल्याचे भाकपाने स्पष्ट केले.

### भाकपाचा इशारा : जनआंदोलन छेडणार

■ निवेदन देताना भाकपाचे तालुका सहसचिव कॉ. विशाल पुज्जलवार कॉ. सतू हेडो तसेच पक्षाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशासनाने तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई केली नाही, तसेच गुंतवणूकदारांचे पैसे व्याजासह परत मिळवून दिले नाहीत, तर भारतीय कम्युनिस्ट पक्ष जनतेच्या न्यायासाठी तीव्र जनआंदोलन छेडेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

## कुरखेडा तालुक्यात ६०० रुपयांत रेती उपलब्ध

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : वाकडी मोहगाव व मालेवाडा घाट पूर्णपणे आरक्षित महाराष्ट्र शासनाच्या वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ अंतर्गत स्थानिक नागरिकांना स्वस्त आणि पारदर्शक पद्धतीने वाळू उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेषतः कुरखेडा तालुक्यात हे धोरण प्रभावीपणे राबवले जात असून, तहसीलदार राहुल पाटील यांनी स्थानिकांना थेट आवाहन केले आहे. वाकडी मोहगाव आणि मालेवाडा हे दोन रेती घाट पूर्णपणे स्थानिक नागरिकांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. या घाटांमधून राखीव आणि लिलावात न गेलेल्या वाळू/रेती स्थानिक घरबांधणी, दुरुस्ती आणि वैयक्तिक वापरासाठी उपलब्ध आहे. प्रति ब्रास केवळ ६०० रुपये रॉयल्टी भरून रेती उचलता येणार आहे – हे दर पूर्वीच्या अवैध बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत परवडणारे आहेत.

ऑनलाइन प्रक्रिया सोपी, झटपट आणि पारदर्शक महाराष्ट्र शासनाच्या महाखनिज पोर्टल (https://mahakhanij.maharashtra.gov.in/) वरून ही संपूर्ण प्रक्रिया घरबसल्या पूर्ण होते: आधार ने OTP द्वारे लॉगिन करा. Common People Application मध्ये अर्ज भरा. आवश्यक कागदपत्रे अपलोड करा (आधार कार्ड, ग्रामसेवक दाखला, स्वयंघोषणापत्र). कमाल ५ ब्रास पर्यंत मागणी करता येईल. तहसीलदारांकडून १५ दिवसांत मान्यता. मान्यतेनंतर पेमेंट लिंक मोबाईलवर १५ दिवसांत ऑनलाइन भरणा. पेमेंट झाल्यावर eTP (इलेक्ट्रॉनिक ट्रान्सपोर्ट परमिट) तयार करा आणि प्रिंट घ्या. वाहतुकीदरम्यान eTP अनिवार्य सोबत ठेवा. ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल असल्याने मध्यस्थ आणि अवैध वाळू माफियांचा मार्ग रोखला गेला आहे. चुकीची माहिती दिल्यास अर्ज नाकारला जाईल आणि बेकायदेशीर वाहतूक/साठवणुकीस कठोर कारवाई होईल. पर्यावरण संरक्षणासह विकासाची हमी हे धोरण नद्यांच्या अवैध उत्खननावर आळा बसवते, कृत्रिम वाळू (M-Sand) ला प्रोत्साहन देते आणि प्रधानमंत्री आवास योजने सारख्या घरकुल योजनांसाठी १०% वाळू राखीव ठेवते. कुरखेड्यातील हजारो कुटुंबांना आता घरबांधणीचे स्वप्न घाबर्याशिवाय पूर्ण करता येईल. तहसीलदार राहुल पाटील म्हणाले, “स्थानिक नागरिकांनी त्वरित महाखनिज पोर्टलवर अर्ज करावा. ही संधी गमावू नका – तुमच्या घरासाठी, तुमच्या विकासासाठी!”



## विलम येथे १०८ गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचा प्रकार उघडकीस ; ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चंद्रपूर : नागभिड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजा विलम परिसरात गोवंशीय जनावरांची मोठ्या प्रमाणावर कत्तलीसाठी तयारी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नागभिड पोलीस ठाण्यात नऊ आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी एकूण १०८ गोवंशीय जनावरे जप्त केली आहेत. जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत ५ लाख ८० हजार रुपये आहे. प्राणी कल्याण अधिकारी राम कृष्णराव नंदनवार (वय ४०), रा. टिमकी रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पशु अधिकार कार्यकर्त्या सुरभी जगदिश लालवाणी यांच्यासह असताना त्यांना मौजा विलम येथे सुमारे २५० गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी शेतांमध्ये बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे २६ जानेवारी रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास पथकासह घटनास्थळी पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान विलम गावालगत बुद्धविहाराच्या मागील बाजूस २० गोवंशीय जनावरे, होमदेव नामदेव पारखी यांच्या शेतात आंब्याच्या झाडाखाली ७० गोवंशीय जनावरे तसेच देविदास दडमल यांच्या शेतात आंब्याच्या झाडाखाली १८ गोवंशीय जनावरे दाटीवाटीने व निर्दयतेने कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचे आढळून आले. तात्काळ पोलीस कंट्रोल रूम, चंद्रपूर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. नागभिड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. एकूण १०८ गोवंशीय जनावरे पुढील कारवाईसाठी नागभिड पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली. घटनास्थळी जनावरांचे मालक असल्याची माहिती कोणीही देण्यास तयार नसल्याने गोपनीय चौकशी करण्यात आली. चौकशीत सुर्या रा. विलम, शाबिर कुरेशी, अजय चौधरी, श्रीकांत चौधरी, नशिर कुरेशी, तनवीर कुरेशी, रहमान कुरेशी, मुनाफ कुरेशी व फिरोज कुरेशी सर्व रा. नागपूर यांनी एकत्रितपणे ही गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० अंतर्गत कलम ११(१), ११(१) (फ), ११(१) (ह), ११(१) (आय), महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ११९ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ चे कलम ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास नागभिड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रमाकांत कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजिंक्य गोविंदलवार करीत आहेत.





# विकसित गडचिरोलीची पूर्तता वेगवान पद्धतीने करूया : सहपालकमंत्री जयस्वाल

## देशातील प्रगतीशील जिल्हा म्हणून गडचिरोलीची नवी ओळख, विकास, रोजगार व सामाजिक न्यायाचा समन्वयित प्रवास

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : नक्षलग्रस्त आणि विकासात शेवटचा जिल्हा म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा, आज देशातील प्रगतीशील जिल्हा म्हणून नवी ओळख निर्माण करत आहे. राज्यात विकास कामे घेतांना गडचिराली जिल्ह्याला राज्य शासनाने सर्वाधिक प्राधाण्य दिले आहे. विकसित गडचिरोलीची पूर्तता अधिक वेगवान पद्धतीने करण्यासाठी सर्वांनी एकत्रित सहभाग नोंदवावा असे आवाहन राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित मुख्य शासकीय ध्वजवंदन समारंभात सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, सहायक जिल्हाधिकारी एम. अरूण प्रामुख्याने उपस्थित होते. राज्य शासनाने विकासकामांमध्ये गडचिरोली जिल्ह्याला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि रोजगारनिर्मिती यांचा समन्वय साधला जात आहे. गडचिरोली जिल्हा आता विकासाच्या नव्या पर्वाकडे ठामपणे वाटचाल करीत आहे, असे सहपालकमंत्री यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्यात सुमारे ३ लाख कोटी रुपयांची औद्योगिक गुंतवणूक येत असून, त्यातून १ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. ही गुंतवणूक म्हणजे केवळ कारखाने नव्हेत, तर स्थानिक युवकांच्या घरात येणारा रोजगार, उत्पन्न आणि सुरक्षित भविष्य असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात निर्माण होणारा रोजगार सर्वप्रथम गडचिरोलीच्या युवकांसाठीच असावा, ही शासनाची स्पष्ट भूमिका असून शिक्षण व कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. औद्योगिक विकासाला पूरक अशी मजबूत दळणवळण व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात येत आहे. भंडारा–गडचिरोली ९४ कि.मी. द्रुतगती महामार्गासाठी ९३१ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली असून, जिल्ह्यात चार प्रमुख सिमेंट काँक्रिट रस्त्यांसाठी सुमारे ५०० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. एटापल्ली–गट्टा मार्गावरील बांडीया नदीवरील पूल, इंद्रावती नदीवरील पूल, भामरागड तालुक्यातील पर्लकोटा नदीवरील पूल तसेच लाहेरी–गुंडेनूर महामार्गाची कामे प्रगतीपथावर असून, वनविभागाच्या परवानगीअभावी रखडलेले प्रकल्प आता मार्गी लागले आहेत. यामुळे दुर्गम व सीमावर्ती भाग मुख्य प्रवाहाशी जोडले जाणार आहेत. हॅम योजनेअंतर्गत राज्यातील सर्वाधिक रस्ते गडचिरोली जिल्ह्यात प्रस्तावित असून, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ कडून ३ हजार कोटी रुपयांचे २७७ कि.मी. आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून २ हजार ३७३ कोटी रुपयांचे ८५ कि.मी. लांबीचे रस्ते प्रस्तावित असल्याची माहिती त्यांनी दिली. वडसा–गडचिरोली ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पाचे सुमारे ५५ टक्के काम पूर्ण झाले असून, डिसेंबर २०२६ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. गडचिरोली विमानतळ, चामोर्शी औद्योगिक क्षेत्र तसेच आरमोरी–गडचिरोली चारपदरी महामार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. सामाजिक न्यायाच्या क्षेत्रातही गडचिरोली जिल्हा राज्यासाठी पथदर्शी ठरत आहे. 'प्रकल्प अदिशा' अंतर्गत महिला बचत गटांसाठी ३.५ कोटी रुपयांचा फिरता निधी मंजूर करण्यात आला असून, जिल्ह्यातील 100 टक्के महिलांना बचत गटांच्या माध्यमातून एक-एक लाख रुपये उद्योगासाठी देत महिलांना आत्मनिर्भर करण्याचा शासनाचा मानस आहे. जिल्ह्यातील २५ हजार ७३२ एकल महिलांना हळदीकुंकू मेळाव्यांच्या माध्यमातून सामाजिक सन्मान देण्यात आला असून, त्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात येत आहे. आजिविका क्लस्टरच्या माध्यमातून महुआ प्रक्रिया, मशरूम उत्पादन, कृषी प्रक्रिया व वनआधारित उद्योग विकसित होत असून, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ब्रँडिंग व बाजारपेठ जोडणीमुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि शाश्वत ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे. जिल्ह्याची निर्यात ४ कोटींवरून ३२ कोटी रुपयांपर्यंत वाढली असून, येत्या काळात हे उद्दिष्ट आणखी मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. शेती क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे मुलचेराची स्ट्रॉबेरी, एटापल्लीचे मशरूम आणि गडचिरोलीची चारोळी यांना बाजारपेठेत ओळख मिळत आहे. आदिवासी ज्ञान, जंगलसंपत्ती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम हाच गडचिरोलीच्या विकासाचा खरा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. आरमोरी येथे प्रस्तावित टसर रेशीम कोष बाजारपेठ आदिवासी व ग्रामीण शेतकऱ्यांसाठी मोठा बदल घडवून आणणार आहे. पर्यावरण संवर्धनाला विकासाची अट मानत जिल्ह्याला राज्यातीलच नव्हे तर देशातील सर्वाधिक हरित जिल्हा बनविण्यासाठी एक कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उद्योग उभारणी करताना जल, जंगल आणि जमीन यांचे संरक्षण ही विकासाची अट असून त्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना, पर्यटन विकास आणि आदिवासी संस्कृतीला चालना देण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. महामहीम राष्ट्रपती यांनी काल जाहीर केलेल्या १२१ पोलीस शौर्य पदकांपैकी सर्वाधिक ३१ पदके गडचिरोली पोलीस दलाला मिळाल्याबद्दल तसेच छत्तीसगड सिमेवर लक्षलप्रवण क्षेत्रात बिनागुंडा येथे पोलीस चौकी उभारण्याबद्दल त्यांनी पोलीस दलाचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहपालकमंत्र्यांनी परेडचे निरीक्षण केले. सी-६० कमांडो पोलिस दल, स्काऊट-गाईड तसेच विविध शैक्षणिक संस्थांच्या पथसंचलनासह प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. एशियन युथ पॅरा गेम्समध्ये धनुर्विद्या प्रकारात सुवर्णपदक मिळविणाऱ्या कु. श्वेता कोवे हिला ५ लाख २० हजार रुपयांचे क्रीडा साहित्य सहपालकमंत्री यांच्या हस्ते देण्यात आले, तर एशियन बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक मिळविणारे विनय कोवे यांचाही सन्मान करण्यात आला. यानंतर सहपालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित गडचिरोली पर्यटन परिवर्तन महोत्सवातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसांचे वितरण केले. कार्यक्रला विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

# गडचिरोली

GOOD MORNING

## आदिवासी गोटूल, गोंड मोहल्ला आलापल्ली येथे तंट्यामामा भिल जयंती उत्साहात साजरी



अहेरी : आदिवासी समाजाचे थोर स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारक तंट्या मामा भिल यांची जयंती २६ जानेवारी रोजी आदिवासी गोटूल, गोंड मोहल्ला, वॉर्ड नंबर ०३ येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास वॉर्ड नंबर ०३ येथील समस्त युवा वर्ग उपस्थित होते. यावेळी तंट्या मामा भिल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित युवकांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान आणि आदिवासी समाजासाठी केलेल्या संघर्षाची माहिती मांडली. कार्यक्रमादरम्यान समाजात एकता, शिक्षण आणि सामाजिक जागृतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. युवकांनी तंट्या मामा भिल यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प केला. संपूर्ण कार्यक्रम शांततामय व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. आलापल्ली नगरातील मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

## संक्षीप्त

### माजी नगरसेवक प्रमोदजी पिपरे यांचे वडिल, जेष्ठ शिक्षकतज्ञ शंकरराव पिपरे काळाच्या पडद्याआड..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



गडचिरोली : गडचिरोली येथील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, वसंत विद्यालयाचे सेवा-निवृत्त शिक्षक श्री. शंकरराव बालाजी पिपरे यांचे दि. 27 जानेवारी 2026 रोजी दुपारी 2.00 वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. निधनसमयी ते 90 वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. स्व. शंकरराव पिपरे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शेकडो विद्यार्थ्यांना घडवून शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. साधेपणा, शिस्तप्रियता, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांविषयीची आपुलकी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. शिक्षक म्हणूनच नव्हे तर एक आदर्श व्यक्ती म्हणून ते सर्वांच्या स्मरणात राहतील. त्यांच्या पश्चात पुत्र माजी नगरसेवक श्री. प्रमोद पिपरे, श्री. अनिल पिपरे, नातू श्री. अनुराग पिपरे, श्री. ऋषिकेश पिपरे,लोकेश पिपरे सून नगरसेवक योगिता पिपरे (माजी नगराध्यक्ष, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष) तसेच आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि. 28 जानेवारी रोजी सकाळी 11.00 ते 12.00 दरम्यान गडचिरोली येथील रेडी गोडाऊनजवळील निवासस्थानापासून निघणार असून वैनगंगा नदीच्या स्मशान घाटावर (बोरमाडा घाट) अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून विविध क्षेत्रातील मान्यवर, माजी विद्यार्थी व नागरिकांकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## भरधाव ट्रकची दुचाकीला समोरासमोर धडक; वडिलांचा जागीच मृत्यू, तर मुलगा गंभीर जखमी

### आरमोरी तालुक्यातील किटाळी येथील घटना..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

आरमोरी : तालुक्यातील किटाळी गावाजवळील बसस्टॉप परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीला समोरासमोर धडक दिल्याची भीषण घटना सोमवार, २६ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात तुळशीदास रामाजी सहारे (रा. देऊळगाव) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा विरेंद्र तुळशीदास सहारे गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेत दिलीप सोमाजी टेकाम यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, देऊळगाव येथील दिलीप सोमाजी टेकाम (वय ४८, व्यवसाय - मजुरी), तुळशीदास रामाजी सहारे व त्यांचा मुलगा विरेंद्र तुळशीदास सहारे हे तिघे मोटारसायकल क्रमांक एमएच ३४-पी-८७८५ वरून भाजीपाला घेऊन देऊळगावकडे परत येत होते. दरम्यान, किटाळी गावाजवळील बसस्टॉपजवळ ट्रक लारी क्रमांक टीएस-०७-यूके-३९९२ च्या चालकाने वाहन बेदरकार व निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवित दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत तुळशीदास सहारे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा विरेंद्र सहारे गंभीर जखमी झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तत्काळ मदत करत जखमींना रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१), १२५ (अ), १२५(ब), ३२४(४), १८४, १३४(अ) (ब) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक कैलास गवते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय चलाख करीत आहेत. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत तुळशीदास सहारे यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



## मग्रारोहयो कंत्राटी कर्मचा-यांचा संप

### ग्रामीण मजूर उपासमारीच्या उंबरठ्यावर

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) सध्या पूर्णपणे कोलमडली असून, याला थेट जबाबदार शासनाची दीर्घकालीन दुर्लक्षाची भूमिका असल्याचा आरोप कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केला आहे. आपल्या न्याय्य मागण्यांकडे सातत्याने कानाडोळा केल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी संप पुकारला असून, त्याचे गंभीर परिणाम ग्रामीण मजुरांवर होत आहेत.

मग्रारोहयो ही योजना ग्रामीण गरिबांसाठी जीवनवाहिनी मानली जाते. मात्र हीच योजना राबविणारे कंत्राटी कर्मचारी गेली अनेक वर्षे अस्थिर सेवेत, तुटपुंज्या वेतनावर आणि कोणतीही सेवा-सुरक्षा नसताना काम करत आहेत. शासनाने वेळोवेळी फक्त आश्वासनांची खैरात वाटली, प्रत्यक्षात मात्र निर्णय शून्य असल्याने कर्मचाऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या स्पष्ट आणि न्याय्य असून, त्यात मग्रारोहयो अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत तात्काळ नियमित अथवा समायोजित करणे, S-2 Infotech कंपनीमार्फत सुरू असलेली कथित बेकायदेशीर व अनधिकृत भरती प्रक्रिया त्वरित बंद करणे, तसेच सदर कंपनीचा करार रद्द करून राज्य निधी असोसिएशन (सोसायटी) मार्फत नियुक्ती देत "समान काम, समान वेतन" धोरण लागू करणे यांचा समावेश आहे. याशिवाय मग्रारोहयोसाठी स्वतंत्र विभागीय यंत्रणा उभारून पदनिहाय आकृतीबंध (Cadre Structure) तयार करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या ढिसाळ व्यवस्थेमुळे गैरप्रकार, मनमानी व भ्रष्टाचार बोकाळल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

दरम्यान, संपामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये रस्ते, जलसंधारण, विहिरी, शेततळे, बंधारे आदी कामे पूर्णतः ठप्प झाली आहेत. परिणामी रोजंदारीवर अवलंबून असलेले हजारो मजूर अचानक बेरोजगार झाले आहेत. काम बंद, मजुरी नाही, आणि घरात अन्नधान्याची चिंता अशी विदारक परिस्थिती ग्रामीण भागात निर्माण झाली आहे. शासनाच्या अपयशाची किंमत मात्र गोरगरीब मजूर मोजत असल्याचे चित्र आहे.








■ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, शासनाने तात्काळ ठोस निर्णय घेतला नाही तर आंदोलनाची धार आणखी वाढवली जाईल. मंत्रालय मोर्चा, कामबंद आंदोलन आणि राज्यव्यापी चक्काजाम यास शासनच जबाबदार राहील, असा थेट इशाराही देण्यात आला आहे. शासन कर्मचाऱ्यांच्या हक्कांकडे डोळेझाक करत राहणार की ग्रामीण मजुरांच्या होणाऱ्या हालअपेष्टांकडे गांभीर्याने पाहणार, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. मग्रारोहयो वाचवायची असेल तर आधी ती राबविणाऱ्यांना न्याय द्यावा लागेल, अन्यथा ग्रामीण महाराष्ट्रात असंतोषाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## गडचिरोलीत रंगणार दोन दिवसीय आदिवासी महोत्सव; राष्ट्रीय स्तराची सांस्कृतिक स्पर्धा

### अमृता फडणवीस, संचालिका दिव्याज फाउंडेशन मुंबई उपस्थित राहणार

**विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : आदिवासी संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी गडचिरोलीत आदिवासी महोत्सव आणि राष्ट्रीय स्तरावरील आदिवासी सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतून 'कोया किंग आणि क्विन' म्हणून विजेत्या स्पर्धकांना गौरविले जाणार आहे. हिरा सुखा बहुउद्देशिय आदिवासी संस्था आणि राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या दोन दिवसीय महोत्सवात महाराष्ट्रासह छत्तीसगड, तेलंगाना, मध्यप्रदेश अशा अनेक राज्यातील स्पर्धक सहभागी होणार असल्याचे मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे व इतर आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले. 28 आणि 29 जानेवारी असे दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोक नेते यांच्या हस्ते आणि आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी तथा दिव्याज फाउंडेशनच्या संचालिका अमृता फडणवीस विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. धानोरा रोडवरील महाराजा हॉलमध्ये होणाऱ्या या महोत्सवात दि. 28 रोजी संध्याकाळी 5 वाजता एकल गीतगायन स्पर्धा, तर संध्याकाळी 7.30 वाजता आदिवासी नृत्य (ग्रुप) स्पर्धा होणार आहे. दि. 29 रोजी आदिवासी सांस्कृतिक साहित्य व वेशभुषा स्पर्धा आणि बक्षीस वितरण होणार आहे. सदर होणाऱ्या महोत्सवाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. आणि आमच्या आनंदात स्वतःचा आनंद द्विगुणीत करावा असे आवाहन आयोजक यांनी केले आहे. पत्रपरिषदेला नियोजन समितीचे रमेश अधिकारी, मनीषा मडावी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.







## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत मौशिखांब गट ग्रामपंचायतीचा समाजाभिमुख उपक्रम

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जेष्ठ नागरिक व वयोवृद्धांचा सन्मान सोहळा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

मौशिखांब : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मौशिखांब गट ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जेष्ठ नागरिक व वयोवृद्धांचा सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात व सन्मानपूर्वक पार पडला. समाजनिर्मितीत आयुष्य वेचणाऱ्या जेष्ठांचा गौरव करून ग्रामपंचायतीने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला.

या कार्यक्रमास ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत श्री. खुशाल नेवारे साहेब, ग्रामपंचायत सरपंच श्रीमती रंजिता पेंदाम, उपसरपंच श्रीमती रुपाली गांधरवार, तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री. विकास उंदीरवाडे व श्री. जयकुमार खेळेकर तंटामुक्ती ग्रामपंचायत मौशिखांब श्री गणेश दहलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



या प्रसंगी गावातील जेष्ठ नागरिक व वयोवृद्धांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. अनुभव, संस्कार, मूल्ये आणि सामाजिक योगदानाची समृद्ध परंपरा जपणाऱ्या जेष्ठ पिढीचा सन्मान करणे ही लोकशाही मूल्यांची खरी जपणूक असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून केवळ भौतिक विकास नव्हे तर सामाजिक विकासालाही समान महत्त्व देण्यात येत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जेष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांचा समन्वय आवश्यक असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित ग्रामस्थांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे मौशिखांब गट ग्रामपंचायत ही केवळ प्रशासकीय संस्था न राहता सामाजिक परिवर्तनाची चळवळ बनत असल्याचे सकारात्मक चित्र निर्माण झाले आहे






# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**